Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# वीतराग विज्ञान पाठमाला

भाग २



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

( श्री टोडरमल ग्रंथमालेचे एकविसावे पुष्प )

# वीतराग -- विज्ञान पाठमाला भाग २

( श्री वीतराग विज्ञान विद्यापीठ परीक्षा बोर्डाद्वारे निर्धारित )

( मूळ हिंदीचा मराठी अनुवाद )

: लेखक व संपादक :

डॉ. हुकमचन्द भारिल्ल

शास्त्री, न्यायतीर्थ, साहित्यरत्न एम्. ए., पीएच्. डी.

संयुक्तमंत्री, श्री टोडरमल स्मारक भवन, जयपूर.

: प्रकाशक :

मंत्री, पं. टोडरमल स्मारक ट्रस्ट

ए–४, बापूनगर, जयपूर–३०२०१५.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

सर्वाधिकार सुरक्षित

⊖ प्रथमावृत्ति : ३००० (१९८०)

⊖ द्वितीयावृत्ति : ३१०० (१९८२)

मूल्य : एक रूपया पचास पैसे

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

## Thanks & Our Request

This shastra has been kindly donated by Dakshaben Sanghvi, Geneva, Switzerland who has paid for it to be "electronised" and made available on the internet.

Our request to you:

1) Great care has been taken to ensure this electronic version of Vitraag Vignaan Pathmala – Part 2 (Marathi) is a faithful copy of the paper version. However if you find any errors please inform us on rajesh@AtmaDharma.com so that we can make this beautiful work even more accurate.

2) Keep checking the version number of the on-line shastra so that if corrections have been made you can replace your copy with the corrected one.

## Version History

| Version Number | Date | Changes |
|---|---|---|
| 001 | 19 July 2008 | First electronic version |

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# समर्पणम्

या भौतिकवादी युगामध्ये संपूर्ण विश्व भोगोन्मुख होत आहे तसेच अशान्तीच्या ज्वालेने संतप्त आहे, अशा वेळी ज्यांनी आध्यात्मिकतेचा प्रसार आणि प्रचार करून अपूर्व आत्मशांतीचा पथ प्रशस्त केला आहे आणि स्वतः निरंतर आत्मसाधनेमध्ये रत आहेत आणि मोहामध्ये गढलेल्या आमच्या सारख्या पामरांना ज्यांनी मुक्तीचा मार्ग दाखवून आमच्यावर महान उपकार केला आहे; परमपूज्य आचार्य धरसेन, कुन्दकुन्द, उमास्वामी, समन्तभद्र, अमृतचन्द्र, नेमिचन्द्र इत्यादी वीतरागी दिगंबर मुनिवरांमध्ये ज्यांची अपार भक्ती आहे, तसेच पंडित प्रवर पाण्डे राजमलजी, कविवर पं. बनारसीदासजी आणि आचार्यकल्प पं. टोडरमलजींच्या संबंधी ज्यांना अपार श्रद्धा आहे, त्या जिनवाणीच्या परमभक्त व प्रबल प्रचारक आध्यात्मिक सन्त पूज्यवर श्री कानजी स्वामींच्या करकमलामध्ये सादर सविनय समर्पित--

मंत्री,

पं. टोडरमल स्मारक ट्रस्ट, जयपूर

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# निवेदन

जिज्ञासू पाठकगण !

प्रस्तुत कृति अत्यंत कोमल अशा बालकांना तत्त्वबोध करून देण्याच्या उद्देशानें पं. टोडरमल स्मारक ट्रस्टतर्फे नियुक्त पाठ्यक्रम समितीद्वारे तयार केलेली आहे. यामध्ये याकडे लक्ष पुरविलेले आहे की सरळ भाषा आणि सुबोध शैलीमध्ये बालकांना तत्त्वज्ञानाची प्राप्ती तर व्हावीच, तसेच सोबत ते नैतिक देखील बनावेत, त्यांचे चरित्र निर्माण व्हावे आणि त्यांना आपल्या प्राचीन गौरवाने देखील प्रेरणा मिळावी, यासाठी यामध्ये तात्त्विक पाठांसोबत सदाचारासंबंधी पाठ आणि पुराण-पुरुषांचे जीवनपरिचयदेखील दिलेले आहेत. तसेच त्यामध्ये धार्मिक संस्कार दृढ होवोत, यासाठी स्तुतींना देखील स्थान दिलेले आहे.

याप्रमाणे पुस्तकाला सर्वांगसुंदर आणि उपयोगी बनविण्याचा प्रयास केलेला आहे. या प्रयत्नामुळे बालकांना थोडा जरी लाभ मिळाला तर आमचे प्रयत्न सार्थकी लागतील. १५ वर्षाच्या काला मध्ये हिंदी व गुजराथी, कन्नड, तामिळ, इंग्रजी मध्ये एक लाख प्रतींचे प्रकाशन हे या पुस्तकाच्या लोकप्रियतेचे प्रत्यक्ष प्रमाण आहे.

तसेच पाठक बंधूंच्या सुविधा व कुशल अध्यापकाची दृष्टी ठेवून पाठ्यक्रमसमितीने प्रशिक्षण-पाठ्यक्रमाची योजना देखील बनविली आहे. ज्या माध्यमाने ग्रीष्मावकाशामध्ये २० दिवसाच्या शिबिरातून अध्यापकांना सर्व प्रकारच्या सुविधा देऊन अध्यापनाच्या प्रायोगिक व सैद्धांतिक पद्धतींशी परिचित करविले जाते.

निवेदक

नेमीचंद पाटनी — मंत्री

पूरणचन्द गोदीका — अध्यक्ष

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# विषय – सूची



| क्रम | नाव पाठ | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | उपासना (देव-शास्त्र-गुरु पूजन) | १ |
| २. | देव-शास्त्र-गुरु | ८ |
| ३. | सात तत्त्वांसंबंधी भूल | १३ |
| ४. | अनुयोग | १७ |
| ५. | तीन लोक | २२ |
| ६. | सप्त व्यसन | २७ |
| ७. | अहिंसा : एक विवेचन | ३२ |
| ८. | अष्टान्हिका महापर्व | ३८ |
| ९. | भगवान पार्श्वनाथ | ४२ |
| १०. | देव-शास्त्र-गुरु स्तुती | ४७ |



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# पाठ १

# उपासना

## देव - शास्त्र - गुरु पूजन

श्री युगलकिशोरजी 'युगल'
(एम. ए.; साहित्यरत्न, कोटा)

### स्थापना

केवल-रवि-किरणों[1] से जिसका, संपूर्ण प्रकाशित है अन्तर।
उस श्री जिनवाणी में होता, तत्त्वों का सुन्दरतम दर्शन ॥
सद्दर्शन-बोध-चरण-पथ पर,[2] अविरल[3] जो बढते है मुनिगण।
उन देव परम आगम गुरु को, शत-शत वंदन शत-शत वंदन ॥

ॐ ह्रीं श्री देव शास्त्र गुरु समूह अत्र अवतर संवौषट्।
ॐ ह्रीं श्री देव शास्त्र गुरु समूह अत्र तिष्ठ तिष्ठ ठः ठः।
ॐ ह्रीं श्री देव शास्त्र गुरु समूह अत्र मम सन्निहितो भव भव वषट्।

### जल

इन्द्रिय के भोग मधुर-विष[4] सम, लावण्यमयी कंचन काया।
यह सब कुछ जड़ की क्रीड़ा है, मैं अब तक जान नहीं पाया ॥
मैं भूल स्वयं के वैभव को, पर ममता में अटकाया हूँ।
अब निर्मल सम्यक्[5] नीर लिये, मिथ्यामल[6] धोने आया हूँ ॥१॥

ॐ ह्रीं श्री देवशास्त्रगुरुभ्यो मिथ्यात्वमलविनाशाय जलं निर्वपामीति स्वाहा।

---

१. केवल ज्ञानरूपी सूर्याच्या किरणाद्वारे. २. सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चरित्राच्या एकतारूपी मुक्ति मार्गावर. ३. निरन्तर. ४. मधूर विष. ५ सम्यग्दर्शन. ६. मिथ्यादर्शनरूपी मळ.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

## चंदन

जड चेतन की सब परिणति प्रभु ! अपने अपने में होती है ।
अनुकूल कहें प्रतिकूल कहें, यह झूठी मन की वृत्ती है ।।
प्रतिकूल संयोगों में क्रोधित, होकर संसार बढाया है ।
सन्तप्त हृदय प्रभु ! चन्दन सम, शीतलता पाने आया है ।।२।।

ॐ ह्रीं श्री देवशास्त्रगुरुभ्यो क्रोधकषायमलविनाशनाय चन्दनं निर्वपामीति स्वाहा ।

## अक्षत

उज्ज्वल हूँ कुन्द धवल हूँ प्रभु! पर से न लगा हूँ किंचित भी ।
फिर भी अनुकूल-लगें उन पर, करता अभिमान निरन्तर ही ।।
जड पर झुक झुक जाता चेतन, की मार्दव[1] की खंडित काया ।
निज शाश्वत[2]'अक्षयनिधि[3]' पानें, अब दास चरण रज में आया ।।३।।

ॐ ह्रीं श्री देवशास्त्रगुरुभ्यो मानकषायमलविनाशनाय अक्षतं निर्वपामीति स्वाहा ।

## पुष्प

यह पुष्प सुकोमल कितना है, तन में माया कुछ शेष नहीं ।
निज अंतर का प्रभु ! भेद कहूँ, उसमें ऋजुता[4] का लेश नहीं ।।
चिंतन कुछ फिर संभाषण कुछ, किरिया कुछ की कुछ होती है ।
स्थिरता निज में प्रभु पाऊँजो, अंतर का कालुष[5] धोती है ।।४।।

ॐ ह्रीं श्री देवशास्त्रगुरुभ्यो मायाकषायमलविनाशनाय पुष्पं निर्वपामीति स्वाहा ।

## नैवेद्य

अब तक अगणित जड द्रव्यों से, प्रभु ! भूख न मेरी शांत हुई ।
तृष्णा की खाई खूब भरी, पर रिक्त[6] रही वह रिक्त रही ।।
युग-युग से इच्छा सागर में, प्रभु ! गोते खाता आया हूँ ।
पंचेन्द्रिय मन के षट्‌रस तज, अनुपम रस पीने आया हूँ ।।५।।

ॐ ह्रीं श्री देवशास्त्रगुरुभ्यो लोभकषायमलविनाशनाय नैवेद्य निर्वपामीति स्वाहा ।

---

१. निराभिमानी आत्मस्वभाव. २. सदा राहणारी. ३. कधी नाश न होणारी निधी. ४. सरलता ५. विकार. ६. रिकामी.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

## दीप

जग के जड दीपक को अब तक, समझा था मैंने उजियारा।
झंझा[1] के एक झकोरे में, जो बनता घोर तिमिर[2] कारा॥
अतएव प्रभो! यह नश्वर दीप, समर्पण करने आया हूँ।
तेरी अंतर लौ[3] से निज अन्तर, दीप जलाने आया हूँ॥६॥

ॐ ह्रीं श्री देवशास्त्रगुरुभ्यो अज्ञानअंधकारविनाशनाय दीपं निर्वपामीति स्वाहा।

## धूप

जड कर्म घुमाता है मुझ को, यह मिथ्या भ्रांति[4] रही मेरी।
मैं राग द्वेष किया करता, जब परिणति होती जड केरी॥
यों भाव करम[5] या भाव मरण,[6] सदियों[7] से करता आया हूँ।
निज अनुपम गंध अनल[8] से प्रभु, पर-गंध[9] जलाने आया हूँ॥७॥

ॐ ह्रीं श्री देवशास्त्रगुरुभ्यो विभावपरिणतिविनाशनाय धूपं निर्वपामीति स्वाहा।

## फल

जग में जिसको निज कहता मैं, वह छोड मुझे चल देता है।
मैं आकुल व्याकुल हो लेता, व्याकुल का फल व्याकुलता है॥
मैं शान्त निराकुल चेतन हूँ, है मुक्तिरमा सहचरि मेरी।
यह मोह तडक कर टूट पडे, प्रभु सार्थक[10] फल पूजा तेरी॥८॥

ॐ ह्रीं श्री देवशास्त्रगुरुभ्यो मोक्षपदप्राप्तये फलं निर्वपामीति स्वाहा।

## अर्घ

क्षण भर निज रस को पी चेतन, मिथ्या मल[11] को धो देता है।
काषायिक भाव विनष्ट किये, निज आनंद अमृत पीता है॥

---

१. वायूचा वेग किंवा वादळ. २. अंधःकार ३. केवलज्ञानरूपी दीपक. ४. खोटी मान्यता. ५–६. राग-द्वेष-मोह रूप विकारी भावच भाव कर्म आणि भाव मरण होत. ७. सैकडों वर्ष. ८. अग्नी. ९. परामध्ये एकत्व बुद्धिरूपी गंध. १०. सफल. ११. मिथ्यादर्शनरूपी मळ.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

अनुपम सुख तब विलसित[1] होता, केवल रवि[2] जगमग करता है।
दर्शनबल[3] पूर्ण प्रगट होता, यह ही अर्हन्त अवस्था है॥
यह अर्घ समर्पण करके प्रभु, निज गुण[4] का अर्घ बनाऊँगा।
और निश्चित तेरे सदृश प्रभु, अर्हन्त अवस्था पाऊँगा॥६॥

ॐ ह्रीं श्री देवशास्त्रगुरुभ्यो अनर्घपदप्राप्तये अर्घं निर्वपामीति स्वाहा।

### स्तवन

भव वन में जी भर घूम चुका, कण-कण को जी भर भर देखा।
मृग-सम[5] मृग-तृष्णा[6] के पीछे, मुझको न मिली सुख की रेखा॥

**भावना**

**अनित्य** झूठे जग के सपने सारे, झूठी मन की सब आशाएँ।
तन-जीवन-यौवन-अस्थिर हैं, क्षणभंगुर पल में मुरझाएँ॥

**अशरण** सम्राट महा-बल सेनानी, उस क्षण को टाल सकेगा क्या।
अशरण मृत काया में हर्षित, निज जीवन डाल सकेगा क्या॥

**संसार** संसार महा दुख-सागर के, प्रभु दुखमय सुख आभासों में।
मुझ को न मिला सुख क्षणभर भी, कंचन कामिनि[7] प्रासादों[8] में॥

**एकत्व** मैं एकाकी[9] एकत्व[10] लिए, एकत्व लिये सब ही आते।
तन धन को साथी समझा था, पर ये भी छोड़ चले जाते॥

**अन्यत्व** मेरे न हुए ये मैं इनसे, अति भिन्न अखण्ड निराला हूँ।
निज में पर से अन्यत्व[11] लिए, निज समरस[12] पीने वाला हूँ॥

**अशुचि** जिसके शृंगारों में मेरा यह, महँगा जीवन घुल जाता[13]।
अत्यन्त अशुचि[14] जड़ काया से, इस चेतन का कैसा नाता॥

**आस्रव** दिन रात शुभाशुभ भावों में, मेरा व्यापार चला करता।
मानस वाणी और काया से, आस्रव का द्वार खुला रहता॥

---

१. प्रकट होतो, शोभित होतो. २. केवलज्ञानरुपी सुर्य ३. अनंत दर्शन अनंत वीर्य. ४. निजस्वभावा (गुणों) चो साधना करीन. ५. मृगासमान. ६. वाळवंटामध्ये तहानलेले हरीण वाळूवरील धगधगत्या उन्हाच्या लहरींना पाणी समजून धावतो परंतु त्यामुळे तहान भागत नाही त्यास मृगतृष्णा म्हणतात.त्याच-प्रमाणे हा आत्मा भोगांमध्ये सुख शोधतो परंतु मिळत नाही. ७ स्त्री. ८ महाला-मध्ये ९.एकटा. १० एकटेपण. ११ भिन्नता. १२. समतारुपी रस. १३.उध्वस्त होते. १४. अपवित्र. १५ मन.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

**संवर** शुभ और अशुभ की ज्वाला से, झुलसा है मेरा अन्तस्थल[1] ।
शीतल समकित[2] किरणें फूटें, संवर से जागे अन्तर्बल[3] ।।

**निर्जरा** फिर तप की शोधक वन्हि जगे, कर्मों की कड़ियाँ टूट पड़ें ।
सर्वांग निजातम प्रदेशों से, अमृत के निर्झर[4] फूट पड़ें ।।

**लोक** हम छोड़ चलें यह लोक तभी, लोकांत[5] विराजें क्षण में जा ।
निज लोक[6] हमारा वासा हो, शोकांत[7] बने फिर हमको क्या ।।

**बोधि-दुर्लभ** जागे मम दुर्लभ बोधि[8] प्रभो, दुर्नयतम[9] सत्वर[10] टल जावे ।
बस ज्ञाता द्रष्टा[11] रह जाऊँ, मद[12] मत्सर[13] मोह विनस जावे ।।

**धर्म** चिर रक्षक धर्म हमारा हो, हो धर्म हमारा चिर साथी ।
जग में न हमारा कोई था, हम भी न रहें जग के साथी ।।

चरणों में आया हूँ प्रभूवर, शीतलता मुझको मिल जावे ।
मुरझाई ज्ञान-लता मेरी, निज अन्तर्बल से खिल जावे ।।

सोचा करता हूँ भोगों से, बुझ जावेगी इच्छा ज्वाला ।
परिणाम निकलता है लेकिन, मानो पावक[14] में घी डाला ।।

तेरे चरणों की पूजा से, इन्द्रिय सुख को ही अभिलाषा ।
अब तक न समझ ही पाया प्रभु, सच्चे सुखकी भी परिभाषा ।।

तुम तो अविकारी हो प्रभुवर, जग में रहते जग से न्यारे ।
अतएव झुके तव चरणों में, जग के माणिक मोती सारे ।।

स्याद्वादमयी तेरी वाणी, शुभनय के झरने झरते हैं ।
उस पावन नौका पर लाखों, प्राणी भव-वारिधि[15] तिरते हैं ।।

---

१. हृदय. २. सम्यग्दर्शन. ३. आत्मशक्ति. ४. झरने. ५. मुक्तीमध्ये. ६. आत्मस्वभावच निजलोक आहे. ७. आमच्या सर्व शोकाचा अंत होणे. ८. सम्यग्दर्शन ज्ञानचारित्र. ९. खोटा नयनरूपी अंधःकार. १०. शीघ्र. ११. ज्ञानदर्शनमय. १२. अभिमान. १३. दाह. १४ अग्नी. १५. संसाररूपी समुद्र.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

हे गुरुवर ! शाश्वत सुख-दर्शक, यह नग्न स्वरूप तुम्हारा है।
जग की नश्वरता का सच्चा, दिग्दर्शन[1] करने वाला है॥
जब जग विषयों[2] में रच पच[3] कर, गाफिल निद्रा में सोता हो।
अथवा वह शिव के निष्कंटक,[4] पथ में विष-कंटक[5] बोता हो॥
हो अर्ध निशा[6] का सन्नाटा, वन में बनचारी चरते हो।
तब शांत निराकुल मानस तुम, तत्त्वों का चिंतन करते हो॥
करते तप शैल[7] नदी तट पर, तरुतल[8] वर्षा की झडियों में।
समता रस पान किया करते, सुख दुःख दोनों की घडियों में॥
अन्तरज्वाला[9] हरती वाणी, मानो झडती हों फुलडियाँ।
भव बन्धन तड़ तड़ टूट पडें, खिल जावें अन्तर की कलियाँ॥
तुम सा दानी क्या कोई हो, जग को दे दीं जग की निधियाँ।
दिन रात लुटाया करते हो, सम-सम[10] की अविनश्वर मणियाँ॥

ॐ ह्रीं श्री देवशास्त्रगुरुभ्यो अनर्घपदप्राप्तये अर्घं निर्वपामीति स्वाहा।

हे निर्मल देव तुम्हें प्रणाम, हे ज्ञान दीप आगम ! प्रणाम।
हे शांति त्याग के मूर्तिमान, शिव-पथ-पंथी गुरुवर प्रणाम॥

**प्रश्न—**

१. चंदन आणि नैवद्याचे छंद लिहून त्याचा भाव आपल्या शब्दात लिहा.

२. जयमालामध्ये वर्णन काय आहे ? संक्षेपामध्ये लिहा—

३. संसार भावना व संवर भावनेचे छंद लिहून त्याचा भाव सांगा—

---

१. दाखविणारा. २. पंचेंद्रियांच्या विषय भोगामध्ये. ३. लीन होऊन. ४. काट्यांनी रहित. ५. विषय-भोगरूपी कांटे. ६. मध्यरात्र. ७. पर्वत. ८. वृक्षाखाली. ९. हृदयाची ज्वाला. १०. समता आणि शांती.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# पाठ २

# देव - शास्त्र - गुरु

## आचार्य समन्तभद्र
## (व्यक्तित्व आणि कर्तृत्व)

लोकेषणा (प्रसिद्धी) पासून दूर राहणारे स्वामी समंतभद्राचार्य यांचे जीवनचरित्र एका दृष्टीने अज्ञातच आहे. जैनाचार्यांची ही विशेषताच आहे की,महान् कार्य केल्यानंतरसुद्धा त्यांनी स्वत:विषयीकुठे काहीसुद्धा लिहिलेले नाही.जे काही थोडे फार प्राप्त आहे,ते पुरेसे नाही.

ते कदम्ब राजवंशाचे क्षत्रीय राजकुमार होते. त्यांचे बालपणाचे नाव शान्तिवर्मा असे होते. त्यांचा जन्म दक्षिण भारतातील कावेरी नदीकाठी असलेल्या उरगपूर नावाच्या गावी झाला होता. त्यांचा काळ विक्रम संवत् १३८ असावा असा अनुमान आहे.

त्यांच्या कौटुंबिक जीवनासंबंधी काहीच माहिती उपलब्ध नाही. त्यांनी लहान वयातच मुनिदिक्षा धारण केली होती. दिगंबर जैन साधु होऊन त्यांनी घोर तपश्चरण केले आणि अगाध ज्ञान प्राप्त केले.

ते जैन सिद्धांताचे तर अगाध ज्ञानी व मर्मज्ञ होतेच परंतु त्याच बरोबर ते तर्क, न्याय, व्याकरण, छंद, अलंकार, काव्य इत्यादी विषयांचे सुद्धा अद्वितीय विद्वान होते. त्यांच्यामध्ये असामान्य वादविवाद शक्ती होती. त्यांनी कित्येक ठिकाणी विहार करून अल्पमती लोकांचा गर्व खंडित केला होता. त्यांचा आत्मविश्वास त्यांच्याच शब्दातून खालील-प्रमाणे व्यक्त होतो.

"वादार्थी विचराम्यहम् नरपते शार्दूविक्रीतम् ॥"

("हे राजन्! मी वादासाठी सिंहाप्रमाणे विहार करीत आहे.")

"राजन् यस्यास्ति शक्तिः स वदतु पुरतो जैन निर्ग्रंथवादी ।"



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

(" मी जैन निर्ग्रंथवादी आहे. ज्याची शक्ती असेल त्यानें माझ्यासमोर बोलावे.")

त्यांच्या नंतरच्या आचार्यांनी त्यांचे स्मरण फारच सन्मानपूर्वक केले आहे आद्य स्तुतीकार म्हणून त्यांची प्रसिद्धी आहे. स्तोत्र साहित्याला त्यांनी प्रौढता प्राप्त करून दिली आहे. त्यांनी केलेली स्तुती अत्यंत गंभीर न्यायाने भरलेली आहे.

त्यांनी आप्तमिमांसा, तत्त्वानुशासन, युक्त्यनुशासन, स्वयंभूस्तोत्र जिनस्तुति शतक, रत्नकरंड श्रावकाचार, प्राकृत व्याकरण, प्रमाण पदार्थ, कर्म प्राभृत टीका आणि गंधहस्ति महाभाष्य (अप्राप्य) नामक ग्रंथाची रचना केली आहे.

पुढील पाठ रत्नकरण्ड श्रावकाचाराच्या पहिल्या अध्यायाच्या आधाराने लिहिलेला आहे.

---

## आधार रत्नकरण्ड श्रावकाचार

### देवाची परिभाषा–

५. आप्तेंनोछिन्नदोषेण, सर्वज्ञेनागमेशिना ।
भवितव्यं नियोगेन, नान्यथा ह्याप्तता भवेत् ॥

६. क्षुत्पिपासाजरातंकजन्मांतकभयस्मया : ।
न रागद्वेषमोहाश्च यस्याप्तः स प्रकीर्त्यते ॥

### शास्त्राची परिभाषा–

९. आप्तोपज्ञमनुल्लङ्घ्य– मदृष्टेष्टविरोधकम् ।
तत्त्वोपदेशकृत–सार्वं शास्त्रं, कापथ–घट्टनम् ॥

### गुरुची परिभाषा–

१०. विषयाशावशातीतो, निरारंभोऽपरिग्रह : ।
ज्ञानध्यानतपोरक्तस्तपस्वी स प्रशस्यते ॥

---



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# देव – शास्त्र – गुरु

**सुबोध** – काय दादा, एवढ्या सकाळी संन्यासी होऊन कोठे जात आहात ?

**प्रबोध** – पूजन करण्यासाठी जात आहे. आज चतुर्दशी आहे ना, मी तर प्रत्येक अष्टमी आणि चतुर्दशीला पूजन अवश्य करतो.

**सुबोध** – काय हो ! कोणाचे पूजन करता तुम्ही ?

**प्रबोध** – देव-शास्त्र आणि गुरूंचे पूजन करतो.

**सुबोध** – कोणत्या देवाची पूजा ?

**प्रबोध** – जैन धर्मामध्ये व्यक्तीची मुख्यता नाही. जैन धर्मामध्ये व्यक्ती ऐवजी गुणपूजेवर विश्वास आहे.

**सुबोध** – असं होय ! तर मग देवाच्या ठिकाणी कोण--कोणते गुण असावयास हवेत ?

**प्रबोध** – खरा देव तोच आहे. जो वीतराग सर्वज्ञ व हितोपदेशी आहे. त्याच्या ठिकाणी कोणासंबंधी राग (ममत्व) नसते. आणि द्वेषही नसतो तोच वीतरागी समजावा. वीतरागी भगवंतांना जन्म--मरणादी १८ दोष नसतात. त्यांना भूक--तहानपण लागत नाही. थोडक्यात असे की, त्यांनी सगळ्या इच्छांवर विजय मिळवला आहे.

**सुबोध** – वीतराग शब्दाचा अर्थ तर समजला पण सर्वज्ञ काय वस्तू आहे ?

**प्रबोध** – जो सर्व काही जाणतो, तोच सर्वज्ञ आहे. ज्याच्या ज्ञानाचा पूर्ण विकास झाला आहे. जो तीन लोकातील सर्व गोष्टी— ज्या भूतकाळात झाल्या, वर्तमानकाळात होत आहेत आणि भविष्यात होतील. त्या सर्व गोष्टींना एकाचवेळी जाणतो, तोच सर्वज्ञ आहे.

**सुबोध** – जो राग--द्वेषरहित आणि पूर्ण ज्ञानी असेल तोच खरा देव आहे, असेच ना ?

**प्रबोध** – होय, असेच आहे. ते जो उपदेश देतील तो खरा आणि कल्याणकारक असेल. त्यांचा उपदेश हितकारक असल्यामुळेच त्यांना हितोपदेशी म्हणतात.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

**सुबोध** – त्यांचा उपदेश खरा आणि कल्याणकारक कशावरून ?

**प्रबोध** – खरे तर असे आहे की, अज्ञानपणामुळे खोटे बोलतात. जेथे देव सर्व काही जाणतातच तर त्यांचा उपदेश खराच असला पाहिजे. आणि त्यांना जर राग–द्वेष नसतात तर ते अहित् कारक कशाला सांगतील ? म्हणून त्यांचा उपदेश कल्याण कारक देखील राहील !

**सुबोध** – देवांचे स्वरूप तर समजले पण शास्त्र म्हणजे काय बरं ?

**प्रबोध** – खऱ्या देवाच्या उपदेशाला शास्त्र म्हणतात. ते वीतराग असतात, म्हणून त्यांचा उपदेश सुद्धा वीतरागतेला पोषक असतो. रागाला (प्रशस्तकषायाला--पुण्याला) धर्म म्हणून सांगणे हा वीतराग देवांचा उपदेश नव्हे. त्यांच्या कथनामध्ये तत्त्वांचा उपदेश असतो. सर्वात महत्वाचे असे की त्यामध्ये कुठेही तत्त्वाला विरोध नसतो.

**सुबोध** – शास्त्राभ्यासाचा काय उपयोग ?

**प्रबोध** – शास्त्राभ्यासामुळे जीव कुमार्गापासून दूर जातो, आणि त्याला खरा मार्ग प्राप्त होतो.

**सुबोध** – ठीक आहे. देव आणि शास्त्र तर तुम्ही समजून दिले. आणि राहिले गुरु आणि गुरु म्हणजे आपले शिक्षकच ना ?

**प्रबोध** -- वेड्या ! शिक्षक तर विद्यागुरु आहेत. त्यांचा सुद्धा आदर करावयास पाहिजे. पण ज्या गुरुंचीं आपण पूजा करतो ते नग्न दिगंबर साधु होत.

**सुबोध** – बरे ! तर मुनिराजांना गुरु म्हणतात हे का सांगत नाहीस? सरळ आहे, जे नग्न राहतात, ते गुरु असतात.

**प्रबोध** – अजून सुद्धा तुम्हाला समजले नाही. गुरु नग्न राहतात हे, तर खरंच आहे, परंतु केवळ नग्न राहण्याने कोणी गुरु होत नाही. त्यांच्या ठिकाणी आणखीही अनेक चांगल्या गोष्टी असतात ते वीतराग भगवंतांच्या वाणीचे मर्म जाणतात.

**सुबोध** – बरे आणखी कोण-कोणत्या गोष्टी त्यांच्या ठिकाणी असतात?

**प्रबोध** – ते नेहमी आत्मध्यान, स्वाध्याय यामध्ये लीन राहतात. सर्व प्रकारच्या आरंभ-परिग्रहापासून सर्वथा रहित असतात. विषय-भोगांची लालसा त्यांच्यात लेश-मात्र सुद्धा नसते. अशा तपस्वी साधूंना गुरु म्हणतात.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**सुबोध** -- ते ज्ञानीपण असतील ?

**प्रबोध** -- काय म्हणता, आत्मज्ञानाशिवाय कोणी मुनी बनूच शकत नाही.

**सुबोध** -- तर आत्मज्ञानाशिवाय हे क्रियाकाण्ड (बाह्याचरण किंवा व्यवहारचारित्र) सगळे बेकार आहे का ?

**प्रबोध** -- ऐका भाऊ ! मूळ वस्तू तर आत्म्याला समजून त्यामध्ये लीन होणे हीच होय. आत्मविश्वास (सम्यग्दर्शन) आत्मज्ञान आणि आत्मलीनता (सम्यक्चारित्र) ज्यांच्या ठिकाणी आहे, आणि ज्यांचे बाह्याचरण सुद्धा आगमानुकूल आहे, तोच खरा गुरु होय.

**सुबोध** -- आता लक्षात आले. तुम्ही त्यांचे पूजन करण्यासाठी जात असाल. आम्ही पण येऊ, परंतु हे तर सांगा त्यामुळे आम्हाला काय मिळेल ?

**प्रबोध** -- पुन्हा तुम्ही अज्ञानपणाचीच गोष्ट केली. पूजा यासाठी केली जाते की, आम्ही सुद्धा त्यांच्याप्रमाणे बनावे. ते सर्व काही सोडून गेले, त्यांच्याकडून संसाराचे काही मागणे कोठपर्यंत बरोबर आहे ?

**सुबोध** -- खरं आहे, उद्यापासून आम्ही पण येत जाऊ, आम्हालाही बोलावत जा.

**प्रश्न--**

१. पूजन कोणाचे आणि का करावे ?

२. खरा देव कोणास म्हणतात ?

३. खरे शास्त्र कशाला म्हणावे ? त्याचा खरेपणा व कल्याणकारकता याचा आधार काय ?

४. गुरु कोणाला म्हणतात ? त्यांच्या विशेषतेचे वर्णन करा ? विद्यागुरु गुरु नाहीत काय ?

५. संक्षिप्त टीपणी द्या-- वीतराग, सर्वज्ञ, हितोपदेशी

६. आचार्य समंतभद्रांच्या व्यक्तित्व आणि कर्तृत्वावर संक्षिप्त प्रकाश टाका.

---



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ ३

# सात तत्त्वांसंबंधी भूल

## अध्यात्मप्रेमी पं. दौलतरामजी
## व्यक्तित्व आणि कर्तृत्व
## (वि. संवत् १८५५-१९२३)

अध्यात्मरसामध्ये निमग्न असणारे एकोणिसाव्या शताब्दीचे तत्त्वदर्शी विद्वान कविवर पं. दौलतरामजी पल्लीवाल जातीतील नररत्न होते. त्यांचा जन्म अलीगढ जवळील सासनी नावाच्या गावी झाला होता. नंतर ते काही दिवस अलीगढला पण राहिले होते. त्यांच्या वडीलांचे नाव टोडरमलजी असे होते.

आत्मस्तुतीपासून दूर राहणाऱ्या या महान् कवीचा जीवन-परिचय पूर्णपणे प्राप्त नाही. पण ते एक साधारण गृहस्थ होते आणि सरळस्वभावी, आत्मज्ञानी पुरुष होते.

त्यांनी रचलेला ग्रंथ छहढाला जैन समाजाला अत्यंत परिचित आणि आदरास पात्र ग्रंथरत्न आहे. क्वचितच कोणी जैन बंधु असेल की, ज्याने छहढालाचे अध्ययन केलेले नाही. सर्व जैन परीक्षा बोर्डाच्या पाठ्यक्रमामध्ये या ग्रंथास स्थान आहे.

या ग्रंथाची रचना त्यांनी वि. संवत् १८९१ मध्ये केली होती. त्यांनी यामध्ये "गागर में सागर" भरण्याचा सफल प्रयत्न केला आहे. याशिवाय त्यांनी कित्येक स्तुती आणि अध्यात्मरसाने ओतप्रोत असलेली अनेक भजन लिहिलेली आहेत, जी आजसुद्धा सगळ्या भारतवर्षाच्या मंदिरात व शास्त्रसभांमध्ये म्हटली जातात. त्यांच्या भजनामध्ये फक्त भक्तीच नाही तर गूढ तत्त्वसुद्धा भरलेली आहेत.

भक्ती आणि अध्यात्माबरोबरच त्यांच्या काव्यामधील काव्य विशेषता ही प्रौढता प्राप्त आहे. भाषा सरळ सुबोध आणि प्रवाही आहे. केवळ काव्य पूर्तीसाठी केवळ शब्दांचा उपयोग केला नाही त्यांची पदे हिन्दी गीत साहित्याच्या कोणत्याही विद्वानांसमोर मोठ्या अभिमानाने ठेवता येण्यासारखी आहेत. हा पाठ त्यांच्या प्रसिद्ध कृती छहढालाच्या दुसऱ्या ढालीवर आधारित आहे.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# सात तत्त्वांसंबंधी भूल

जीवादी सात तत्त्वांचे खरे स्वरूप समजल्याशिवाय सम्यग्दर्शनाची प्राप्ती होऊ शकत नाही.अनादी काळापासून जीवाला सप्ततत्त्वासंबंधी भ्रांती आहे. येथे संक्षेपामध्ये त्या भ्रांतीचे स्वरूप स्पष्ट केले जात आहे.

**जीव अजीव तत्त्वांसंबंधी भूल ।**

जीवाचा स्वभाव ज्ञानदर्शनमय आहे,आणि पुद्‌गलापासून बनलेले शरीरादी स्पर्श, रस, गंध, वर्णयुक्त असल्यामूळे मूर्तीक आहेत,धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, कालद्रव्य आणि आकाशद्रव्य अमूर्तिक असूनसुद्धा जीवाची परिणती या सर्वांहून भिन्न आहे. तरीसुद्धा हा आत्मा या भेदाला जाणत नसल्यामुळे शरीरादीच्या परिणतीला आपली परिणती मानतो.

आपल्या ज्ञानस्वभावासा विसरून शरीराच्या सुंदरतेमुळे आपल्याला सुंदर व कुरुपतेमुळे आपल्याला कुरुप मानतो. तसेच त्याच्या (शरीराच्या) संबंधाने होणाऱ्या पुत्रादिकांमध्येसुद्धा आत्मबुद्धी करतो शरीराश्रित उपवासादी आणि उपदेशादी क्रियांमध्येसुद्धा आत्मपणाचा अनुभव करतो.

शरीराच्या उत्पत्तीला आपली उत्पत्ती मानतो आणि शरीराच्या वियोगाला आपले मरण मानतो. हीच याची जीव आणि अजीव तत्त्वांसंबंधी भूल आहे.

जीवाला अजीव मानणे जीव तत्त्वासंबंधी भूल आहे आणि अजीवाला जीव मानणे अजीव तत्त्वासंबंधी भूल आहे.

**आस्रव तत्त्वासंबंधी भूल ।**

राग-द्वेष-मोह आदी विकारी भाव दुःख देणारे आहेत, हे प्रगट आहे. पण हा जीव यांचेच सेवन करीत आपल्याला सुखी मानतो. आणि वर असे म्हणतो की, शुभराग तर सुखकर आहे, त्याने तर पुण्यबंध होईल, स्वर्गादिकांचे सुख मिळेल, पण हा विचार करीत नाही की, जे बंधाचे कारण आहे ते सुखाला कारण कसे होईल ? आणि पहिल्या ढालीत तर स्पष्टच सांगितले आहे की, स्वर्गात सुख कोठे आहे ? जर संसारात सुख नाहीच तर मिळेल कोठून ? म्हणून जो शुभाशुभ राग

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

प्रगट दुःख देणारा आहे त्याला सुखकर मानणे हीच आस्रवतत्त्वासंबंधी भूल आहे.

**बंध तत्त्वासंबंधी भूल :**

हा जीव शुभ कर्मांच्या फळांविषयी राग (ममत्व) करतो आणि अशुभ कर्मांच्या फळाविषयी द्वेष करतो. भोग-सामुग्रीची प्राप्ती हे शुभकर्मांचे फळ आहे आणि भोग हे दुःखमयच आहेत, सुखमय नाहीत. म्हणून शुभ आणि अशुभ दोन्ही कर्मं वास्तविक संसाराचे कारण असल्यामुळे हानिकारक आहेत आणि मोक्ष तर शुभ अशुभ बंधाच्या नाशामुळेच होतो-हे तो जाणत नाही. हीच याची बंधतत्त्वासंबंधी भूल आहे.

**संवर तत्त्वासंबंधी भूल :**

आत्मज्ञान आणि आत्मज्ञानसहित वैराग्य संवर आहे आणि हेच आत्म्याला सुखी करणारे आहेत, पण हा त्यांना कष्टदायी मानतो. तात्पर्य हे की, सम्यग्यज्ञानाची प्राप्ती आणि वैराग्याची प्राप्ती कष्टदायक आहे, असे मानतो. ज्ञान आणि वैराग्याची प्राप्ती आनंदमयी असते. दुःखमयी नसते याचा त्याला पत्ताच नसतो.

त्यांना कष्टदायक मानणे ही संवर तत्त्वासंबधी भूल आहे.

**निर्जरा तत्त्वासंबंधी भूल :**

आत्मज्ञानपूर्वक इच्छेचा अभावच निर्जरा आहे. आणि तीच आनंदमय आहे. त्याला न ओळखता तसेच आत्मशक्तीला विसरून इच्छेच्या पूर्तीमध्येच हा सुख मानतो आणि इच्छेच्या अभावाला सुख मानीत नाही, हीच याची निर्जरा तत्त्वासंबंधी भूल आहे.

**मोक्ष तत्त्वासंबंधी भूल :**

मुक्तीमध्ये पूर्ण निराकुलतारूप खरे सुख आहे. त्याला जर जाणत नाही आणि भोगविषयक सुखालाच सुख मानतो आणि मुक्तीमध्ये-देखील याच जातीच्या सुखाची कल्पना करतो. हीच याची मोक्ष तत्त्वासंबंधी भूल आहे.

जोपर्यंत या सातही तत्त्वांसंबंधी भ्रांति काढून टाकणार नाही तोपर्यंत यास खरे सुख प्राप्त करण्याचा मार्ग मिळू शकणार नाही.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

## आधार

चेतन को है उपयोगरूप, चिन्मूरत विन मूरत अनूप ।
पुद्‌गल नभ धर्म अधर्म काल, इनतै न्यारी है जीव चाल ।
ताको न जान विपरित मान, करि करै देहमें निज पिछान ।
मैं सुखी दुखी मैं रंक राव, मेरे धन गृह गोधन प्रभाव ।
मेरे सुत तिय मैं सबल दीन, बेरूप सुभग मूरख प्रवीन ।
तन उपजत अपनी उपज जान, तन नशत आपको नाश मान ।
रागादी प्रगट ये दुःख दैन, तिनहीं को सेवत गिनत चैन ।
शुभ अशुभ बंध के फल मंझार, रति अरति करै निजपद विसार ।
आतम-हित हेतु विराग-ज्ञान, ते लखै आपको कष्ट दान ।
रोकी न चाह निज शक्ति खोय, शिवरूप निराकुलता न जोय ।

**प्रश्न :**

१. जीव आणि अजीव तत्त्वांविषयी या जीवाने कोणत्या प्रकारची भूल केली आहे ?

२. "आम्ही शुभ केले तर सुखी होऊ," असे मानण्यात कोणत्या तत्त्वासंबंधी भूल आहे ?

३. "तत्त्वज्ञान प्राप्त करणे कष्टदायक आहे" हे खरे आहे काय ? जर नाही तर का ?

४. "जसे सुख आम्हाला आहे, तसेच त्यापेक्षा कित्येक पट अधिक मुक्त जीवांना आहे," असे मानण्यात काय बाधा आहे ?

५. "जर परस्पर प्रेम (राग) कराल तर आनंदाने राहाल" ? ही मान्यता बरोबर आहे काय ?

---



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# पाठ ४ चार अनुयोग

## आचार्यकल्प पं. टोडरमलजी

### (व्यक्तित्व आणि कर्तृत्व)

आचार्यकल्प पंडित टोडरमलजींचे वडील श्री. जोगीदासजी खण्डेलवाल दि. जैन या जातीतील गोदिका गोत्रातील होते, आणि त्यांच्या आईचे नाव रंभाबाई होते. ते विवाहित होते. त्यांना दोन पुत्र होते. हरिश्चंद्र आणि गुमानीराम. गुमानीराम महान् प्रतिभाशाली आणि त्यांच्याचप्रमाणे क्रांतीकारी होते. पंडितजींचे अधिकांश जीवन जयपूरमध्येच गेले असले तरी त्यांना आपल्या आजीविकेसाठी काही वेळ सिंघाणा येथे रहावे लागले होते. ते तेथे दिल्लीच्या एका सावकाराकडे काम करीत होते.

परंपरागत मान्यतेनुसार त्याचे आयुष्य २७ वर्षांचे मानले जाते. परंतु त्यांची साहित्य-साधना, ज्ञान व नवीनतम प्राप्त उल्लेख व प्रमाणांच्या आधारावर हे निश्चित झाले आहे की ते ४७ वर्षापर्यंत अवश्य जीवित होते. वि.सं. १८२३-२४ च्या जवळपास त्यांचा मृत्यू काल असावा. म्हणून त्यांचा जन्म वि. सं. १७७६-७७ मध्ये झाला असला पाहिजे.

त्यांनी आपल्या जीवनात लहान मोठ्या बारा रचना लिहिल्या. त्या रचना जवळजवळ १ लाख श्लोक प्रमाण आहेत आणि पाच हजार पृष्ठांच्या जवळपास आहेत. यात काही तर लोकप्रिय ग्रंथांच्या विशाल प्रामाणिक टीका आहेत आणि काही स्वतंत्र रचना आहेत. त्या गद्य आणि पद्य दोन्ही स्वरूपात पहावयास मिळतात.

१ मोक्षमार्ग प्रकाशक (मौलिक)
२ रहस्यपूर्ण चिठ्ठी (मौलिक)
३ गोम्मटसार पूजा (मौलिक)
४ समोशरण रचना वर्णन (मौलिक)
५ पुरुषार्थसिद्धयुपाय भाषा टीका
६ आत्मानुशासन भाषा टीका
७ गोम्मटसार जीवकांड भाषा टीका
८ गोम्मटसार कर्मकांड भाषा टीका
९ अर्थ संदृष्टी अधिकार
१० लब्धिसार भाषा टीका
११ क्षपणासार भाषा टीका
१२ त्रिलोकसार भाषा टीका

(सम्यग्ज्ञान चंद्रिका)

त्यांच्या संबंधीच्या विशेष माहितीसाठी "पंडित टोडरमल व्यक्तित्व और कर्तृत्व" ग्रंथ पहावयास हवा. पुढील पाठ मोक्षमार्ग प्रकाशकाच्या आठव्या अधिकाराच्या आधारावर लिहिला गेला आहे.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# चार अनुयोग

**विद्यार्थी** -- 'मोक्षमार्ग प्रकाशक'मध्ये कोणाची कथा आहे ?

**अध्यापक** -- मोक्षमार्ग प्रकाशकमध्ये कथा थोडीच आहे ? त्यात तर मुक्तीचा मार्ग सांगितला आहे.

**विद्यार्थी** -- असं ? तर मग काय मोक्षमार्ग प्रकाशक शास्त्र नाही?

**अध्यापक** -- का ?

**विद्यार्थी** -- शास्त्रात तर कथा असतात. आमचे वडील म्हणत होते की, मंदिरात येत चला, सायंकाळी तेथे शास्त्र वाचले जाते, त्यात चांगल्या-चांगल्या कथा सांगितल्या आहेत.

**अध्यापक** -- होय! शास्त्रांमध्ये महापुरुषांच्या कथासुद्धा असतात. ज्या शास्त्रांमध्ये महापुरुषांच्या चरित्राद्वारे पुण्य-पापांच्या फळांचे वर्णन असते आणि शेवटी वीतरागतेला हितकर सांगितले जाते. त्यांना प्रथमानुयोग शास्त्र म्हणतात.

**विद्यार्थी** -- यावरून शास्त्रांचे अनेक प्रकार दिसतात ?

**अध्यापक** -- शास्त्र तर जिनवाणीला म्हणतात, त्यात तर वीतरागतेचे पोषण असते. त्याचे कथन करण्याच्या पद्धती चार आहेत. यानांच अनुयोग असे म्हणतात. प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग आणि द्रव्यानुयोग.

**विद्यार्थी** -- आम्हाला तर गोष्टी असलेले शास्त्र फार आवडते त्यात खूप आनंद वाटतो.

**अध्यापक** -- बाळ ! शास्त्राचा चांगलेपणा तर वीतरागतारूप धर्माच्या वर्णनामध्ये आहे, कोऱ्या गोष्टींमध्ये नाही.

**विद्यार्थी** -- तर मग ह्या गोष्टी शास्त्रांमध्ये लिहिल्यातच कां ?

**अध्यापक** -- तुम्हीच म्हणत होता की, आमचे मन कथांमध्ये फार रमते. रागी जीवांचे मन केवळ वैराग्य कथनामध्ये लागत नाही. म्हणून ज्याप्रमाणे लहान मुलाला बत्ताशाबरोबर औषध दिले जाते,त्याचप्रमाणे अल्पबुद्धी जीवांना कथेच्या माध्यमाने धर्मामध्ये (वीतरागतेमध्ये) रुची करवितात आणि शेवटी वैराग्याचे पोषण करतात.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

**विद्यार्थी** -- बरोबर आहे, आले लक्षात. असं आहे होय ? हे पुराण आणि चरित्र -- ग्रंथ प्रथमानुयोगामध्येच येत असतील. करणानुयोगामध्ये कशाचे वर्णन असतें ?

**अध्यापक** -- करणानुयोगामध्ये गुणस्थान, मार्गणास्थान इ.रूप जीवाचे वर्णन असते. आणि कर्म व तीन लोकांच्या भूगोलासंबंधी वर्णन असते. यामध्ये गणिताची मुख्यता असते कारण यामध्ये गणना आणि मापाचे वर्णन असते.

**विद्यार्थी** -- हे तर समजायला कठीण जात असेल ?

**अध्यापक** -- होय. कारण यात अतिसूक्ष्म केवलज्ञानगम्य विषयांचे वर्णन असते, गोम्मटसार जीवकाण्ड, गोम्मटसार कर्मकाण्ड लब्धिसार आणि त्रिलोकसार इत्यादी करणानुयोगाचे ग्रंथ आहे.

**विद्यार्थी** -- चरणानुयोग सोपा पडत असावा, होय ना ?

**अध्यापक** -- होय ! कारण यात स्थूल बुद्धिगोचर कथन असते. यात सुभाषित, नीतिशास्त्रांची पद्धती मुख्य आहे, कारण यात गृहस्थ आणि मुनींच्या आचरणांच्या नियमांचे वर्णन असते. या अनुयोगामध्ये कोणत्याही प्रकारे हा जीव पाप सोडून धर्मामध्ये लागावा अर्थात् त्याने वीतरागतेमध्ये वृद्धि करावी अशा अनेक युक्त्यांनी कथन केले जाते.

**विद्यार्थी** -- तर रत्नकरण्ड श्रावकाचार याच अनुयोगाचे शास्त्र असेल

**अध्यापक** -- होय, ते तर आहेच, त्याबरोबरच मुख्यतया पुरुषार्थ-सिद्ध्युपाय इ. आणखीसुद्धा अनेक शास्त्रे आहेत.

**विद्यार्थी** -- तर मग काय समयसार आणि द्रव्यसंग्रह सुद्धा याच अनुयोगाची शास्त्र आहेत ?

**अध्यापक** -- नाही ! ती तर द्रव्यानुयोगाची शास्त्र आहेत कारण षट्द्रव्य, सप्त तत्त्व इत्यादींचे आणि स्व-परभेद विज्ञान इ. चे वर्णन द्रव्यानुयोगामध्ये असते.

**विद्यार्थी** -- यातसुद्धा करणानुयोगाप्रमाणे केवल ज्ञान गम्य कथन असेल ?

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**अध्यापक** -- नाही, यात तर चरणानुयोगाप्रमाणे बुद्धिगोचर कथन असते,पण चरणानुयोगामध्ये बाह्य क्रियेची मुख्यताअसते आणि द्रव्यानुयोगामध्ये आत्मपरिणामांच्या मुख्यतेनेकथन असते.द्रव्यानुयोगामध्ये न्यायशास्त्राची पद्धती मुख्य असते

**विद्यार्थी** -- यात न्याय शास्त्राची पद्धती मुख्य का बरे ?

**अध्यापक** -- कारण यात तत्त्वनिर्णय करण्याची मुख्यता आहे. निर्णय युक्ती आणि न्यायाशिवाय कसा होईल ?

**विद्यार्थी** -- काही लोक म्हणतात की, अध्यात्मशास्त्रामध्ये बाह्याचाराला हीन म्हटले आहे, ते वाचून लोक आचार भ्रष्ट होतील. काय हे खरे आहे ?

**अध्यापक** -- द्रव्यानुयोगात आत्मज्ञानशून्य कोऱ्या बाह्याचाराचा निषेध केला आहे, परंतु ठिकठिकाणी स्वच्छंदी होण्याचा देखील निषेध केला आहे. यामुळे तर लोक आत्मज्ञानी बनून खरे व्रती बनतील.

**विद्यार्थी** -- जर कोणी अज्ञानी धर्मभ्रष्ट झाला तर ?

**अध्यापक** -- जर गाढव साखर खाल्ल्यामुळे मरत असेल तर सज्जन काही साखर खाणे सोडणार नाही, त्याचप्रमाणे जर अज्ञानी तत्त्वाची गोष्ट ऐकून भ्रष्ट होईल तर ज्ञानी काही तत्त्वाभ्यास सोडणार नाहीत. तो (अज्ञानी) पूर्वी मिथ्यादृष्टी होता,आतासुद्धा मिथ्यादृष्टी राहील. एवढेच नुकसान होईल, की सुगती न मिळता त्याला कुगती मिळेल, राहील तर संसारातच. परंतु अध्यात्माचा उपदेश नसल्यामुळे अनेक जीवांच्या मोक्षमार्गाचा अभाव होतो आणि यामुळे त्या जीवांचे फारच वाईट होते. यामुळे अध्यात्म उपदेशाचा निषेध करू नये.

**विद्यार्थी** -- ज्यामुळे धोका संभवतो अशी शास्त्रे वाचावीच का ? ती वाचली नाहीत तर काय बिघडणार आहे ?

**अध्यापक** -- मोक्षमार्गाचा मूळ उपदेश तर अध्यात्म-शास्त्रातच आहे, त्यांच्या निषेधाने मोक्षमार्गाचा निषेध होईल.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**विद्यार्थी** :- पण प्रथम तर द्रव्यानुयोग वाचू नये ना ?

**अध्यापक** -- जैन धर्मानुसार तर ही परिपाटी आहे की प्रथम द्रव्यानुयोगानुसार सम्यग्दृष्टी व्हावे, नंतर चरणानुयोगानुसार व्रतादी धारण करून व्रती व्हावे. म्हणून मुख्य रूपाने तर खालच्या दशेतच द्रव्यानुयोग कार्यकारी आहे.

**विद्यार्थी** :- प्रथम तर प्रथमानुयोगाचा अभ्यास केला पाहिजे ?

**अध्यापक** -- प्रथम याचा अभ्यास केला पाहिजे, नंतर त्याचा, असा नियम नाही.आपल्या परिणामाची अवस्था पाहून ज्याच्या अभ्यासाने आपली धर्मामध्ये रुची आणि प्रवृत्ती वाढेल, त्याचाच अभ्यास करावा किंवा कधी याचा तर कधी त्याचा, फेर-बदल करून अभ्यास केला पाहिजे काही शास्त्रांमध्ये तर दोन-तीन अनुयोगांच्या एकत्र पद्धतीने सुद्धा कथन असते.

**प्रश्न--**

१. अनुयोग कशास म्हणतात ? ते किती प्रकारचे आहेत ?

२. पं. टोडरमलजींच्या अनुसार अनुयोगाचा अभ्यासक्रम काय आहे ?

३. द्रव्यानुयोगाचा अभ्यास का आवश्यक आहे ? त्यामध्ये कोणत्या पद्धतीने कोणत्या विषयाचे वर्णन असते ?

४. चरणानुयोग आणि करणानुयोगामध्ये काय फरक आहे ?

५. प्रत्येक अनुयोगाच्या कमीतकमी दोन-दोन ग्रंथाची नावे लिहा.

६. पं. टोडरमलजींच्या संबंधी आपले विचार व्यक्त करा.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ ५

# तीन लोक

## आचार्य गृद्धपिच्छ उमास्वामी
### (व्यक्तित्व आणि कर्तृत्व)

तत्त्वार्थसूत्रकर्तारं, गृद्धपिच्छोपलक्षितम् ।
वन्दे गणींद्रसंजातमुमास्वामीमुनीश्वरम् ॥

कमीतकमी लिहून जास्तीतजास्त प्रसिद्धी प्राप्त करणाऱ्या आचार्य गृद्धपिच्छ उमास्वामींच्या तत्त्वार्थसूत्राशी जैन समाज जेवढा अधिक परिचित आहे, तेवढेच त्यांच्या जीवन परिचयासंबंधी अपरिचित आहे.

हे कुन्दकुन्दचार्यांचे पट्टशिष्य होते व विक्रम संवत प्रथम शताब्दीच्या अंतिम काळात तसेच द्वितीय शताब्दीच्या पूर्वार्धामध्ये त्यांनी भारत–भूमीला पवित्र केले होते.

आचार्य गृद्धपिच्छ उमास्वामी त्या गौरवशाली आचार्यांमध्ये आहेत ज्यांना समग्र आचार्य परंपरेमध्ये पूर्ण प्रमाणिकता आणि सन्मान प्राप्त आहे. अशा गौरवशाली आचार्यांपैकी आचार्य गृद्धपिच्छ उमास्वामी एक होत. जे महत्व वैदिकांमध्ये गीतेचे, ख्रिश्चनांमध्ये बायबलचे आणि मुसलमानांमध्ये कुराणाचे मानले जाते, तेच महत्त्व जैन परंपरेमध्ये गृद्धपिच्छ उमास्वामींच्या तत्त्वार्थसूत्राला प्राप्त आहे. याचे दुसरे नाव मोक्षशास्त्र सुद्धा आहे. हा संस्कृत भाषेतील सर्वप्रथम जैन ग्रंथ आहे.

हा ग्रंथराज जैन समाजाद्वारे संचलित सर्व परिक्षाबोर्डाच्या पाठ्यक्रमात निर्धारित आहे आणि सगळ्या भारतवर्षाच्या जैन विद्यालयामध्ये शिकविला जातो.

पुढील पाठ तत्त्वार्थसूत्राच्या तिसऱ्या आणि चवथ्या अध्यायाच्या आधारावर लिहिला गेला आहे.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# तीन लोक

**विद्यार्थी** :- गुरुजी ! आज प्रवचनात ऐकले की कुन्दकुन्दाचार्य देव श्री सीमंधर भगवंतांचे दर्शन करण्यासाठी विदेह क्षेत्रात गेले होते, हे विदेह क्षेत्र कोठे आहे ?

**अध्यापक** -- हे सारे विश्व तीन लोकात विभागले आहे. जेथे आम्ही' तुम्ही राहतो, तो मध्यलोक आहे. यात असंख्यात द्वीप आणि असंख्यात समुद्र आहेत. ते एकमेकांना वेढलेले आहेत.सर्वांच्या मध्यभागी जंबूद्वीप आहे. त्याच्या सभोवती लवण समुद्र आहे, त्याच्या सभोवती धातकी खण्ड आहे, त्याच्या सभोवती कालोदधी समुद्र वेढलेला आहे, नंतर पुष्करवर द्वीप आणि पुष्करवर समुद्र आहे. याप्रमाणे असंख्यात द्वीप आणि समुद्र आहेत.

**विद्यार्थी** -- आम्ही आणि आपण तर जंबूद्वीपात राहतो पण सीमंधर भगवान कोठे राहतात ?

**अध्यापक** -- ते पण जंबूद्वीपातच राहतात. जंबूद्वीप लहानसे थोडेच आहे ? हे तर एक लाख योजन विस्ताराचे आहे. त्याच्या मधोमध सुमेरु नामक गोल पर्वत आहे आणि या गोल जंबूद्वीपाला विभागणारे सहा महापर्वत आहेत. हे पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत पसरलेले आहेत. हिमवन,महाहिमवन,निषध नील, रूक्मि आणि शिखरिणी अशी त्यांची नावे आहेत.

**विद्यार्थी** -- जर हे पूर्व पश्चिम पसरलेले आहे तर जंबूद्वीप सात भागामध्ये विभागला गेला आहे असे समजवयास पाहिजे?

**अध्यापक** – होय ! ह्याच सात भागांनाच तर सात क्षेत्र म्हणतात. त्यांची नावे भरत, हैमवत, हरि, विदेह, रम्यक, हैरण्यवत आणि ऐरावत आहेत.

**विद्यार्थी** -- आता समजले, जंबूद्वीपाचा जो मधला भाग तो विदेह क्षेत्र आहे आणि तेथेच सीमंधर भगवान आहेत. पण आम्ही कुठे आहोत ?

**अध्यापक** -- त्याच्याच दक्षिणेला जे भरत क्षेत्र आहे ना ? त्यातच

# जम्बूद्वीप


ऐरावत
विजयार्द्ध पर्वत
क्षेत्र
शिखरी
पुण्डरीक
पर्वत
हैरण्यवत
रूप्यकूला
सुवर्णकूला
क्षेत्र
रुक्मि
महा पुण्डरीक
पर्वत
रम्यक
नरकान्ता
क्षेत्र
नील
केशरी
पर्वत
विदेह
सुमेरु
सीतोदा
सीता
क्षेत्र
निषध
तिगिञ्छ
पर्वत
हरि
हरिकान्ता
हरित
क्षेत्र
महा हिमवन
महा पद्म
पर्वत
हैमवत
रोहितास्या
रोहित
क्षेत्र
हिमवन
पद्म सरोवर
पर्वत
भरत
विजयार्द्ध पर्वत
क्षेत्र
क्षेत्र-
जल-
पर्वत-

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

आम्ही राहतो. येथेच कुन्दकुन्द जन्मले होते. आणि ते विदेह क्षेत्रामध्ये गेले होते.

**विद्यार्थी** -- आम्ही सुद्धा तेथे जाऊ शकत नाही का ?

**अध्यापक** -- नाही बाळ ! सांगितले होते ना? की रस्त्यात मोठे-मोठे विशाल पर्वत आहेत. त्या प्रत्येक पर्वतावर एक-एक विशाल सरोवर आहे. त्यामधून १४ नद्या निघतात आणि सातही क्षेत्रामध्ये वाहतात. त्यांची नावे आहेत. गंगा, सिंधू, रोहित, रोहितास्या, हरित-हरिकान्ता, सीता, सीतोदा, नारी-नरकान्ता, सूवर्णकूला-रूप्यकूला आणि रक्ता-रक्तोदा.

ह्या नद्या क्रमाने भरत क्षेत्रापासून ऐरावत क्षेत्रामध्ये प्रत्येकामध्ये दोन-दोन वाहतात. त्यापैकी पहिली पूर्व समुद्राला व दुसरी पश्चिम समुद्राला मिळते.

या मध्यलोकाला तिर्यक लोकसुद्धा म्हणतात, कारण हे आडवे सपाट पसरलेले आहे ?

**विद्यार्थी** -- म्हणजे मध्यलोकाची रचना आडवी पसरलेली आहे असेच ना.

**अध्यापक** -- मध्यलोकची रचना-आडवी आहे. पण अधोलोकची रचना आडवी नाही. अधो लोक एका खाली एक आहेत.

**विद्यार्थी** -- काय आहे म्हणालात ? अधोलोक ?

**अध्यापक** -- होय! होय ! याच पृथ्वीच्या खाली सात नरक आहेत. यांची नावे रत्नप्रभा, शर्कराप्रभा, बालुकाप्रभा, पंकप्रभा, धूमप्रभा, तमःप्रभा, महातमप्रभा अशी आहेत ते क्रमशः एका खाली एक आहेत. ही स्थाने अत्यंत दुःखद आहेत. राहण्याचे ठिकाण पण बिळाप्रमाणे असते.तेथील जलवायू अत्यंत दूषित असते. तेथील जीव बाह्य वातावरणाच्या प्रतिकूलतेमुळे दुःखी तर असतातच, परंतु त्यांच्या कषायाची तीव्रतापण अधिक आहे. म्हणून ते परस्परात मारहाण करीत असतात. नरक हे दुःखाचे माहेर घरच आहे. जेव्हा जीव घोर पाप करतो तेव्हा तेथे उत्पन्न होतो. जे जीव तेथे उत्पन्न होतात त्यांना नारकी जीव म्हणतात.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

**विद्यार्थी** -- पापी जीव तर नरकात जातात आणि पुण्यात्मे कुठे जातात ?

**अध्यापक** -- पुण्यात्मे स्वर्गात जातात.

**विद्यार्थी** -- हे स्वर्ग कोठे आणि कसे आहेत ?

**अध्यापक** -- स्वर्ग होय ? स्वर्ग तर उर्ध्व लोकामध्ये आहेत.

**विद्यार्थी** -- त्यांची रचना आडवी आहे की एका खाली एक आहे?

**अध्यापक** -- स्वर्ग तर एकावर-एक आहेत.

**विद्यार्थी** -- असं होय, म्हणजे नरक सात आहेत आणि स्वर्ग किती आहेत ?

**अध्यापक** -- स्वर्ग तर सोळा आहेत, त्यांची नावे सौधर्म-एशान, सानत्कुमार-माहेन्द्र, ब्रह्म-ब्रह्मोत्तर, लान्तव-कापिष्ठ, शुक्र-महाशुक्र, सतार-सहस्त्रार, आनत-प्राणत, आरण-अच्युत अशी आहेत याच्या ही वर नऊ ग्रैवेयक, नऊ अनुदिश आणि पाच अनुत्तर विमाने आहेत. सर्वार्थसिद्धी याच पाचामध्ये पाचवे विमान आहे.

**विद्यार्थी** -- त्याच्या वर काय आहे ?

**अध्यापक** -- सिद्धशिला, जेथे अनंत सिद्ध विराजमान आहेत तीन लोकांची सामान्यपणे अशी रचना आहे.

**विद्यार्थी** -- गुरुजी आम्हाला तर पूर्ण संतोष झाला नाही. थोडे विस्ताराने अधिक सांगावे.

**अध्यापक** -- एका दिवसाच्या पाठामध्ये याहून अधिक काय समजाविले जाऊ शकेल ? जर तुम्हाला जिज्ञासा असेल तर तत्त्वार्थ-सूत्र, तत्त्वार्थवार्तिक, त्रिलोकसार इ. शास्त्रातून जाणून घेतले पाहिजे.

**प्रश्न :**

१. जम्बूद्वीपाचा नकाशा काढून त्यात प्रमुख स्थाने दाखवा.

२. नरक किती आहेत ? त्यांची नावे लिहून तेथील स्थितीचे वर्णन आपल्या शब्दांमध्ये करा.

३. क्षेत्रांचे विभाजन करणाऱ्या पर्वतांची व क्षेत्रांची नावे लिहून कुन्दकुन्द आणि सीमंधर स्वामींचे निवासस्थान सांगा.

---

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ ६

# सप्त व्यसन

## कवीवर पण्डित बनारसीदासजी
### (व्यक्तित्व आणि कर्तृत्व)

अध्यात्म आणि काव्य या दोन्ही क्षेत्रांमध्ये सर्वोच्च प्रतिष्ठा प्राप्त असलेले पं बनारसीदासजी सतराव्या शताब्दीचे रससिद्ध कवि आणि आत्मानुभवी विद्वान होते.

त्यांचा जन्म श्रीमाळ वंशात लाला खरगसेनांच्या घरी वि. संवत १६४३ मध्ये माघ शुद्ध एकादशी, रविवारी झाला. त्यावेळी त्यांचे नाव विक्रमजित ठेवले गेले. परंतु बनारस यात्रेच्या वेळी पार्श्वनाथांच्या जन्मभूमी वाराणसीच्या नावावरून त्यांचे नाव बनारसीदास ठेवले गेले. ते आपल्या आई-वडीलांचे एकुलते एक चिरंजीव होते.

त्यांनी आपल्या जीवनात बरेच चढ-उतार पाहिले होते. पुष्कळ वेळा त्यांना आर्थिक विषमतेशीसुद्धा सामना करावा लागला तसेच त्यांचे कौटुंबिक जीवनही फारसे समाधानकारक नव्हते. त्यांची तीन लग्ने झाली. सात मुले व दोन मुली झाल्या पण एकसुद्धा जिवंत राहिले नाही अशा विषम स्थितीतसुद्धा त्यांचे धैर्य खचले नाही, कारण ते आत्मानुभवी पुरुष होते.

काव्य प्रतिभा तर त्यांना जन्मतःच प्राप्त होती. वयाच्या चौदाव्या वर्षीच ते उच्च कोटीच्या कविता करू लागले होते. पण



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

प्रारंभिक जीवनात ते शृंगारिक कवितांमध्ये मग्न राहिले. १४ वर्षाच्या वयातच त्यांनी त्यांची सर्व प्रथमकृती 'नवरस' तयार केली होती. त्यामध्ये अधिकांश शृंगाररसाचेच वर्णन होते ही शृंगाररसाची एक उत्कृष्ट कृती होती, आत्मभान झाल्यानंतर कवीने ती कविता गोमती नदीच्या प्रवाहात सोडून दिली.

त्यानंतर त्यांचे जीवन अध्यात्ममय झाले. त्यानंतरच्या चार रचना सध्या उपलब्ध आहेत-'नाटक समयसार', 'बनारसी विलास', 'नाममाला' आणि 'अर्द्धकथानक'.

'नाटक समयसार' अमृतचंद्राचार्यांच्या कलशाचा एक प्रकारचा पद्यानुवाद आहे. परंतु कवीच्या मौलीक जाणीवेमुळे नाटक समयसार ग्रंथाचे अध्ययन करीत असताना स्वतंत्र कृती असल्याप्रमाणे वाटते. हा ग्रंथराज अध्यात्म रसाने परिपूर्ण भरलेला आहे.

'अर्द्धकथानक' हिन्दी भाषेतील प्रथम आत्मचरित्र आहे.ही एक प्रौढतम कृती आहे. यामध्ये कवीचे ५५ वर्षाचें जीवन दर्पणसदृश्य चित्रित झाले आहे.

'बनारसी-विलास' हा कवीच्या अनेक रचनांचा संग्रह-ग्रंथ आहे आणि 'नाममाला' कोष काव्य आहे.

कवी आपल्या आत्मसाधना व काव्यसाधना या दोन्हीमध्ये एक अनुपम व्यक्ती होते.

---



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

## सप्त व्यसन

जुआ आमिष मदिरा दारी,
आखेटक चोरी पर नारी ।
एही सात व्यसन दुखदाई,
दूरित मूल दुर्गति के भाई ।।
दर्वित ये सातों व्यसन, दुराचार दुखधाम ।
भावित अंतर-कल्पना, मृषा मोह परिणाम ।।

---

अशुभ में हार शुभ में जीत यही है द्यूत कर्म ।
देह की मगनताई, यहै मांस भखिबो ।।
मोह की गहल सों अजान यहै सुरापान ।
कुमति की रीति गणिका को रस चखिबो ।।
निर्दय व्है प्राणघात करबो यहै शिकार ।
पर-नारी संग पर-बुद्धि को परखिबो ।।
प्यार सों पराई सौंज गहिबे की चाह चोरी ।
एई सातों व्यसन बिडारी ब्रम्ह लखिबो ।।

–बनारसीदास

जुगार खेळणे, मांस खाणे, मदिरा पान, वेश्यागमन, शिकार खेळणे, चोरी करणे, परस्त्री सेवन ही सात व्यसने आहेत.

कोणत्याही विषयामध्ये लवलीन होण्याला अर्थात् सवयीला व्यसन म्हणतात.येथे वाईट विषयांमध्ये लवलीन होण्याला व्यसन म्हटले आहे. आणि त्याचे सात भेद सांगितले आहेत जे जीवामध्ये प्रामुख्याने आकुलता उत्पन्न करतात आणि त्यांना दुराचारी बनवितात त्यांना व्यसन म्हणतात. तसे तर राग- द्वेष आकुलता उत्पन्न करविणाऱ्या सगळ्याच सवयी व्यसनच आहेत. निश्चयाने तर जे आत्मस्वरूपाच्या विस्मरणाला कारण होतात त्यांना व्यसन म्हणतात. वास्तविक मिथ्यात्व सहितराग-द्वेष परिणामच व्यसन होत.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

१) **जुगार**–जय-पराजयावर दृष्टी ठेवून रुपये पैसे किंवा कोणत्याही प्रकारच्या धनाच्या सहाय्याने कोणताही खेळ खेळणे किंवा शर्थ लावून कोणतेही काम करणे किंवा डाव लावून जास्त लाभाची आशा किंवा हानीचे भय असणे हा द्रव्य जुगार आहे.

शुभ (पुण्य उदय) मध्ये जय (हर्ष) व अशुभ (पापोदय) मध्ये पराजय (विषाद) मानणे भावजुगार आहे. या भावाचा (मान्यतेचा) त्याग करणे हाच खरा जुगार त्याग आहे.

२) **मांस खाणे** :- मारून किंवा मारलेल्या त्रस जीवांचे शरीर खाण्यामध्ये आसक्त राहणे किंवा भक्षण करणे द्रव्य-मांस खाणे व्यसन आहे. देहामध्ये मग्न राहणे अर्थात् शरीराच्या पुष्ट होण्यास आपले (आत्म्याचे) हित किंवा शरीराच्या दुर्बलतेवर आपले (आत्म्याचे) अहित मानणे भाव–मांस खाणे व्यसन आहे.

३) **मदिरा पान** :- दारू, भांग, चरस, गांजा इत्यादी मादक वस्तूंचे सेवन करणे द्रव्य-मदिरा पान होय व मोह विवश होऊन आत्म-स्वरूपाविषयी अज्ञानी राहणे, भाव–मदिरा पान होय.

४) **वेश्यागमन** :- वेश्येशी रमणे, तिच्या घरी जाणे–येणे द्रव्य रूप वेश्यागमन आहे; आणि खोटया बुद्धीमध्ये रमण्याचा भाव, भाव-वेश्यागमन आहे अर्थात आपल्या आत्मस्वभावाला सोडून विषय–कषायामध्ये बुद्धी रमविणे हेच वेश्यागमन आहे. वेश्या धन, आरोग्य व अब्रू नष्ट करते. पण मिथ्यामती (कुबुद्धी) तर आत्म्याच्या प्रति-ष्ठेचे हरण करून अनंतकाळापर्यंत निगोदाच्या दुःखात ढकलून देते.

(५) **शिकार खेळणे** - जंगलातील अस्वल, वाघ, हरीण डुक्कर वगैरे स्वच्छंद फिरणाऱ्या जनावरांना किंवा लहान लहान पक्षांना निर्दयी होऊन बन्दूक वगैरेसारख्या कोठल्याही हत्याराने मारणे व मारून आनंदित होणे द्रव्य–रूप शिकार खेळणे आहे, आणि तीव्र रागवश असे कार्य करण्याच्या परिणामाद्वारे आपल्या चैतन्य प्राणांचा घात करणे हे भाव-रूप शिकार खेळणे आहे.

६) **परस्त्रीरमण**:- धर्मानुकूल विवाह केलेल्या पत्नीला सोडून अन्य स्त्रीयांबरोबर रमण करणे, द्रव्य परस्त्रीरमण व्यसन आहे. तत्त्वाला



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

समजण्याचा प्रयत्न न करता दुसऱ्यांच्या बुद्धीची पारख करण्यातच ज्ञानाचा सदुपयोग आहे असे मानणे भाव परस्त्री-रमण आहे.

७) **चोरी करणे** :- न दिलेल्या कोणत्याही वस्तूचे प्रमादपूर्वक ग्रहण करणे चोरी आहे आणि प्रीतिभावाने (मोहभावाने) परवस्तूमध्ये आपलेपणाची इच्छा करणे ही भाव चोरी आहे.

या सात व्यसनांचा त्याग केल्याशिवाय आत्म्याला जाणणे शक्य नाही.

ज्यास संसाराच्या दुःखापासून अरुची झाली आहे आणि आत्मस्वरूप प्राप्त करून खरे सुख प्राप्त करावयाचे आहे, त्यास सर्वप्रथम वरील सात द्रव्य-व्यसनांचा त्याग अवश्य करावयास हवा, कारण जोपर्यंत एक जरी व्यसन राहील तोपर्यंत सम्यग्दर्शनाची प्राप्ती होऊशकत नाही.आत्मरुचिपूर्वक आत्मस्वभावाच्या वृद्धीमध्ये आनंदित झाल्यामुळे भाव व्यसन सहज सुटतात. ही सातही व्यसने वर्तमानातसुद्धा प्रत्यक्ष रूपाने दुखःदाई आणि जगतनिंद्य आहेत.समाजातही व्यसन सेवन करणाऱ्याला व्यसनी आणि दुराचारी म्हणतात.

**प्रश्न—**

१. कविवर पं. बनारसीदासजींच्या व्यक्तित्व व कर्तृत्वावर प्रकाश टाका.
२. व्यसन कशास म्हणतात ? ती किती आहेत ? नावे लिहा.
३. द्रव्य जुगार, भावमदिरापान, भाव परस्त्रीरमण आणि द्रव्यशिकार व्यसन यांना स्पष्ट करा.
४. निम्नलिखित ओळींचा अर्थ स्पष्ट करा.

   " देह की मगनताई, यहै मांस भखिबो "

   " प्यार सों पराई सौंज गहिबे की चाह चोरी । "

---



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ ७

# अहिंसा : एक विवेचन

## आचार्य अमृतचन्द्र
## (व्यक्तित्व आणि कर्तृत्व)

अध्यात्मिक संतांमध्ये कुन्दकुन्दाचार्यांच्या नंतर आचार्य अमृतचंद्रांचेच नाव घेतले जाते. दुःखाची गोष्ट आहे की, १२ व्या शताब्दीच्या जवळपास होणाऱ्या या महान् आचार्यांविषयी त्यांच्या ग्रंथांशिवाय इतर काहीही आम्ही जाणू शकत नाही.

लोक प्रशंसेपासून दूर राहणाऱ्या आचार्य अमृतचंद्रांनी तर अपूर्व ग्रंथांची रचना करूनसुद्धा असे लिहिले आहे की,-

वर्णैः कृतानि चित्रैः पदानि,
तु पदैः कृतानि वाक्यानि ।
वाक्यैः कृतं पवित्रं शास्त्र-
मिदं न पुनरस्माभिः ।।

– पुरुषार्थसिद्ध्युपाय

वेगवेगळ्या वर्णांनी पदे बनली, पदांनी वाक्ये बनली आणि वाक्यांनी हे पवित्र शास्त्र बनले. मी यात काहीही केले नाही.

या प्रकारचा भाव त्यांनी तत्त्वार्थ-सारमध्ये सुद्धा प्रकट केला आहे.

पं. आशाधरजींनी त्यांना ''ठक्कुर'' शब्दाने संबोधित केले आहे, यावरून असा निर्णय होऊ शकतो की यांचा उच्च क्षत्रिय घराण्याशी संबंध असला पाहिजे.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

त्यांचा संस्कृत भाषेवर अपूर्व अधिकार होता. त्यांच्या गद्य आणि पद्य दोन्ही प्रकारच्या रचनांमध्ये त्यांची भाषा भावानुवर्तिनी आणि सहज बोधगम्य शिवाय माधुर्य गुणांनी युक्त आहे. ते आत्मरसामध्ये निमग्न असत म्हणून त्यांच्या रचना अध्यात्मरसाने भरलेल्या आहेत.

त्यांचे सर्व ग्रंथ संस्कृत भाषेमध्ये आहेत. त्यांच्या रचना गद्य आणि पद्य दोन्ही रुपात प्राप्त आहेत. गद्य रचनांमध्ये आचार्य कुन्दकुन्दांच्या महान् ग्रंथांवर त्यांनी लिहीलेल्या टीका आहेत.

१. समयसार टीका– जी "आत्मख्याति"च्या नावाने ओळखली जाते.

२. प्रवचनसार टीका– यास "तात्पर्य दीपिका" म्हणतात.

३. पंचास्तिकाय टीका– याला "समय व्याख्या" म्हणून ओळखतात.

४. तत्त्वार्थ सार– हा ग्रंथ गृद्धपिच्छ उमास्वामींच्या गद्यसूत्रांचा एका तऱ्हेने पद्यानुवादच आहे.

५. पुरुषार्थसिद्धयुपाय– गृहस्थ धर्मावर हा त्यांचा मौलिक ग्रंथ आहे. यात हिंसा आणि अहिंसा यांचे अतिशय तथ्यपूर्ण विवेचन केले आहे.

पुढील निबंध त्यांच्या पुरुषार्थसिद्धयुपाय ग्रंथावर आधारित आहे.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# अहिंसा : एक विवेचन

"अहिंसा परमो धर्म:" अहिंसेला परम धर्म घोषित करणारी ही सूकती आज अति प्रचलित आहे,हे तर एक सर्वमान्य सत्य आहे की, अहिंसा हाच परम धर्म आहे. पण प्रश्न हा आहे की,अहिंसा काय आहे?

हिंसा आणि अहिंसा यांची चर्चा जेव्हा चालते, त्यावेळी आमचे लक्ष मुख्यत: दुसऱ्या जीवांना मारणे,सतविणे किंवा रक्षा करणे इत्यादी कडेच जाते. हिंसा आणि अहिंसा यांचा संबंध मुख्यतः दुसऱ्यांशीच जोडला जातो.दुसऱ्यांची हिंसा करू नका फक्त हीच अहिंसा आहे असाच सर्वाधिक विश्वास आहे. स्वत:ची सुद्धा हिंसा होते याकडे फारच थोड्या लोकांचे लक्ष जाते.कोणाचे गेले तरी ते आत्महिंसेचा अर्थ विषभक्षणादी द्वारे आत्मघात (आत्महत्या) असाच समजतात पण तिच्या अंतरमर्मा-पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला जात नाही. आत्म्यामध्ये राग-द्वेषाची उत्पत्तीसुद्धा हिंसा आहे. या वस्तुस्थितीला फारच थोडे लोक जाणतात. यामुळेच आचार्य अमृतचंद्रांनी हिंसा आणि अहिंसेची व्याख्या करताना अंतरंग दृष्टीलाच प्रधानता दिली आहे. ते लिहितात–

अप्रादुर्भाव: खलु रागादिनां भवत्यहिंसेति ।
तेषामेवोत्पत्ती: हिंसेति जिनागमस्य संक्षेप : ।।

राग–द्वेष-मोह इ.विकारी भावांची उत्पतीच हिंसा आहे आणि त्या भावांचे उत्पन्न न होणे हीच अहिंसा आहे.

म्हणून ते स्पष्ट घोषणा करतात की, परिणती राग-द्वेष-मोहरूप झाल्यामुळे असत्य, चोरी, कुशील आणि परिग्रहसुद्धा प्रकारान्तराने हिंसाच आहे.

आत्म परिणाम हिंसन हेतुत्वात्सर्वमेवहिंसैतत् ।
अनृतवचनादि केवलमुदाहृतं शिष्यबोधाय ।।

योग्य आचरण करणाऱ्या सत्पुरुषांच्या ठिकाणी रागादी भावांच्या उत्पत्ती अभावी केवळ पर-प्राण-पीडन झाल्याने हिंसा होत नाही आणि अयत्नाचार (असावधानी) प्रवृत्ति असणाऱ्या जीवांकडून अन्य जीव

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

मरोत किंवा न मरोत हिंसा अवश्य होते. कारण तो कषाय भावामध्ये प्रवृत्त होऊन आत्मघात तर करीतच राहतो आणि "आत्मघाती महापापी" म्हटले गेले आहे.

येथे कोणी म्हणू शकेल की, जर दुसऱ्या जीवाचा मरण्या व न मरण्याशी हिंसेचा काही संबंध नाही तर मग हिंसेच्या कार्यापासून दूर राहण्याची काय आवश्यकता आहे? फक्त परिणामच शुद्ध ठेवावेत. याचे उत्तर देतांना आचार्य म्हणतात–

सूक्ष्मापि न खलु हिंसा परवस्तु निबंधना भवति पुंसः ।
हिंसायतन निवृत्ति परिणाम विशुद्धये तदपि कार्या ॥

परवस्तुमुळे किंचित्सुद्धा हिंसा होत नसली तरीदेखील परिणामांच्या शुद्धीसाठी हिंसेला निमित्त होणाऱ्या परिग्रहादिकांना सोडले पाहिजेत.

व्यवहारात ज्याला हिंसा म्हणतात, (जसे– दुसऱ्यास त्रास देणे, दुःख देणे इ )ती हिंसा नाही असे नाही, ती तर हिंसा आहेच, कारण तिच्यात प्रमादाचा योग असतो पण आमचे लक्ष तिच्यावरच केंद्रीत होते आणि आम्ही अंतरंगामध्ये होणाऱ्या भावहिंसेकडे दृष्टी टाकू शकत नाही म्हणून येथे विशेषकरून अन्तरंगात होणाऱ्या रागादी भावरूप भावहिंसेकडे ध्यान आकर्षित केले आहे. जो जीवाच्या बाह्य स्थूलहिंसेचा त्याग करणार नाही तो तर या अन्तरंगातील हिंसेला समजूच शकणार नाही.

म्हणून चित्तशुद्धीसाठी अभक्ष्य भक्षणादी आणि रात्री भोजनादी हिंसक कार्याचा त्याग तर अति आवश्यक आहेच; तसाच मद्य, मांस, मधु आणि पाच उदम्बर फळांचा त्यागसुद्धा आवश्यक आहे कारण यांच्या सेवनाने अनन्त त्रस जीवांचा घात होतो आणि परिणामामध्ये क्रूरता उत्पन्न होते. अहिंसक वृत्ती असणाऱ्या मन्द कषायी जीवाची या प्रकारची अनर्गल प्रवृत्ती असत नाही.

हिंसा दोन प्रकारची आहे,

१) द्रव्य हिंसा
२) भाव हिंसा



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

जीवांच्या प्राणांचा घात करण्याला द्रव्यहिंसा म्हणतात आणि घात करण्याच्या परिणामाला भावहिंसा म्हणतात, एवढेतर सामान्यत: सर्वच लोक समजतात, पण जीवाला वाचविण्याचा भावसुद्धा वास्तविक खरी अहिंसा नाही. कारण तो सुद्धा रागभाव आहे. हे सहसा लक्षात येत नाही.

राग-भाव कोणत्याही प्रकारचा असो, त्याची उत्पत्ती निश्चयाने तर हिंसाच आहे. कारण ती बंधास कारण आहे. आचार्य अमृतचंद्रांनी जेथे राग-भावाच्या उत्पत्तीला हिंसेमध्ये गर्भित केले आहे तेथे त्याच्या व्यापक अर्थाकडे (शुभ आणि रागाकडे) आचार्यांचे लक्ष गेले नसावे असे मानता येत नाही.

रागभाव कोणत्याही प्रकारचा असो ती हिंसाच आहे अशी अहिंसेची खरी आणि सर्वोत्कृष्ट व्याख्या आचार्य अमृतचंद्रांनी केली आहे की, जर पशस्त रागाच्या उत्पत्तीला काही ठिकाणी अहिंसा म्हटले असेल तर ते व्यवहाराचे कथन जाणले पाहिजे.

येथे प्रश्न उपस्थित होऊ शकतो की, अशी अहिंसा तर साधूच पाळू शकतात. म्हणून ही अहिंसा साधू विषयक झाली. सामान्य जनांसाठी (श्रावकांसाठी) तर दयारूप दुसऱ्यास वाचविण्याचा भाव, अहिंसाच खरी आहे. पण आचार्य अमृतचंद्रांनी श्रावकाच्या आचरण्याच्या प्रकरणामध्येदेखील या विषयाला घेऊन हे सिद्ध केले आहे की, अहिंसा दोन प्रकारची नसते.अहिंसेला जीवनात उतरविण्याचे मार्ग-स्तर दोन असू शकतात. हिंसा तर हिंसाच राहील. जर श्रावक पूर्ण हिंसेचा त्यागी होऊ शकत नाही तर त्याने अल्प हिंसेचा त्याग करावा परंतु जी हिंसा तो सोडू शकत नाही त्याला जर अहिंसा मानले जाऊ शकत नाही. जर आम्ही पूर्णपणे त्याग करू शकत नाही तर आम्हाला अंशत: हिंसेचा त्याग करावयास पाहिजे. जर अंशत:ही हिंसेचा त्याग करू शकलो नाही तर कमीतकमी हिंसेला धर्म मानणे आणि सांगणे तर सोडायलाच पाहिजे. शुभभाव हा राग असल्यामुळे हिंसेमध्ये मोडतो आणि त्याला आम्ही धर्म मानायचे हे तर ठीक नाही.

राग-द्वेष मोह भावांची उत्पत्ती होणे हिंसा आहे, आणि त्यांना धर्म मानणे महाहिंसा आहे. रागादी भावांची उत्पत्ती न होणे हीच



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

परम अहिंसा आहे. आणि रागादी भावांना धर्म न मानणे हीच अहिंसे-संबंधी खरी मान्यता आहे.

येथे प्रश्न उपस्थित होतो की, तीव्र राग तर हिंसा आहे, पण मंद रागाला हिंसा का म्हटले ? पण गोष्ट अशी आहे की, जेव्हा राग हिंसा आहे तर मंद राग अहिंसा कसा होईल ?ती पण रागाची एक अवस्थाच आहे, ही गोष्ट अवश्य आहे की, मंद राग मंद हिंसा आहे आणि तीव्र राग तीव्र हिंसा आहे. म्हणून जरी आम्ही हिंसेचा पूर्ण त्याग करू शकत नाही, तरी त्याला मंद तर करायला पाहिजे. राग जेवढा कमी होईल तेवढे चांगलेच, पण त्याच्या सद्भावाला धर्म म्हटले जाऊ शकत नाही. धर्म तर राग-द्वेष मोहाचा अभावच आहे आणि तीच अहिंसा आहे. जिला परमधर्म म्हटले जाते.

प्रश्न--

१. "अहिंसा" या विषयावर एक संक्षिप्त निबंध लिहा, त्यामध्ये अहिंसेसंबंधी प्रचलित असलेल्या विपरित मान्यतेचे निराकरण करून सम्यक् विवेचन करा.

२. आचार्य अमृतचंद्रांच्या व्यक्तित्व आणि कर्तृत्वावर प्रकाश टाका.

३. "रागादी भावांची उत्पत्ती होणे हिंसा आहे आणि रागादी भावांची उत्पत्ती न होणे अहिंसा आहे" या विचाराचे तर्कसंगत विवेचन करा.

४. मंद रागाला अहिंसा म्हणण्यात काय आपत्ती आहे स्पष्ट करा.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ ८

# अष्टान्हिक महापर्व

**दिनेश** – चला जिनेश ! पान खाता काय ?

**जिनेश** – नाही.

**दिनेश** – का बरे ?

**जिनेश** – तुम्हाला माहिती नाही होय ? आज कार्तिक शुद्ध अष्टमी आहे ना ? आजपासून अष्टान्हिक महापर्व सुरू झाला आहे.

**दिनेश** – तर काय झाले ? सण तर खाण्यापिण्यासाठीच असतात. पर्वाच्या दिवसात तर लोक गोड खातात, उत्तम कपडे घालतात-आणि मजेने राहतात आणि तुम्ही . . . ?

**जिनेश** – हे बघ ! हा खाण्यापिण्याचा पर्व नाही. हा तर धार्मिक पर्व आहे यात तर लोक संयमाने राहतात, पूजा-पाठ करतात, तात्त्विक चर्चा करतात, हा तर आत्मसाधनेचा पर्व आहे. धार्मिक पर्वाचे प्रयोजन तर आत्म्यामध्ये वीतराग-भावाची वृद्धी करणे हेच आहे.

**दिनेश** – या पर्वाला अष्टान्हिक का म्हणतात ?

**जिनेश** – हा आठ दिवसापर्यंत चालतो ना ! अष्ट म्हणजे आठ, अन्हि म्हणजे दिवस. आठ दिवसाचा उत्सव म्हणजे अष्टान्हिक पर्व.

**दिनेश** – तर हा प्रत्येक वर्षी कार्तिक महिन्यात आठ दिवसाचा असावा !

**जिनेश** – होय ! कार्तिक महिन्यामध्ये तर प्रत्येक वर्षी हा पर्व येतोच. पण वर्षातून तीन वेळ येतो. अष्टान्हिक पूजनामध्ये म्हटले आहे.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

कार्तिक फागुन साढ के, अन्त आठ दिन माँहि ।
नन्दीश्वर सुर जात हैं, हम पूजें इह ठाँहि ।।

कर्तिक शुद्ध अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंत, फाल्गुन शुद्ध अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंत आणि आषाढ शुद्ध अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंत, वर्षांमधून तीन वेळा हा पर्व साजरा केला जातो. देव लोक तर हा पर्व साजरा करण्यासाठी नंदीश्वर द्वीपामध्ये जातात, पण आम्ही तेथे जाऊ शकत नाही, म्हणून येथेच भक्तीभावाने पूजा करतो.

**दिनेश** – हे नंदीश्वर द्वीप कोठे आहे ?

**जिनेश** – तीन लोकाचा पाठ तुम्ही वाचलाय ना ! त्यात मध्यलोकामध्ये जे असंख्यात द्वीप आणि समुद्र आहेत, त्यात हे आठवे द्वीप आहे.

**दिनेश** – आम्ही तेथे का जाऊ शकत नाही ?

**जिनेश** – तिसऱ्या पुष्कर द्वीपामध्ये एक पर्वत आहे, ज्याचे नाव मानुषोत्तर पर्वत आहे, मनुष्य त्याच्यापुढे जाऊ शकत नाही, यासाठी त्याचे नाव मानसोत्तर पर्वत पडले आहे.

**दिनेश** – असे ! तेथे काय आहे की, देव तेथे जातात.

**जिनेश** – तेथे पुष्कळ मनोज्ञ अकृत्रिम (स्वनिर्मित) ५२ जिनमंदीर आहेत. तेथे जाऊन देवगण पूजा भक्ती आणि तत्त्वचर्चा इ. द्वारे आत्मसाधना करतात. आम्ही तेथे जाऊ शकत नाही, म्हणून येथेच विविध धार्मिक आयोजनाद्वारे आत्महितामध्ये प्रवृत्त होतो.

**दिनेश** – हा पर्व भारतात कोठे-कोठे साजरा केला जातो आणि त्यात काय-काय असते ?

**जिनेश** – सर्व भारतवर्षात जैन समाज या महापर्वाला मोठ्या उत्साहाने साजरा करतो, अधिकांश ठिकाणी सिद्धचक्र-विधान पूजा करतात. बाहेरून विद्वान बोलविले जातात, त्यांची आध्यात्मिक विषयावर प्रवचने होतात. एक प्रकारे सगळ्या जैन समाजात धार्मिक वातावरण पसरले जाते.

**दिनेश** – हे सिद्ध चक्र काय आहे ? याच्या पाठात काय असते ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

जिनेश – सिद्धचक्र? काय तुम्ही सिद्धचक्र विधान पूजा पाहिली नाही?

दिनेश – नाही.

जिनेश – मुक्त जीवांना सिद्ध म्हणतात जे संसाराच्या बंधनापासून मुक्त आहेत, ज्यांच्यात अनंत दर्शन, अनंत ज्ञान आणि अनंत सुख प्रगट झाले आहे.जे अष्टकर्मापासून रहित आहेत, राग-द्वेषाच्या बंधनातून मुक्त आहेत. असे अनंत परमात्मा लोकाच्या अग्रभागी विराजमान आहेत, त्यांनाच सिद्ध म्हणतात. आणि त्यांचा समुदायच सिद्धचक्र होय म्हणून सिद्धचक्र विधान पूजेमध्ये सिद्धाची पूजा-भक्ती असते. त्याबरोबरच त्यांच्या जयमालेमध्ये फारच सुंदर आत्महित करणारा तत्त्वोपदेश सुद्धा असतो, वास्तविक ते समजून घेण्यायोग्य आहे.

दिनेश – जयमालेमध्ये तर स्तुती असते ना ?

जिनेश – स्तुती तर असतेच, पण त्याबरोबरच सिद्धांनी सिद्धदशा कशी प्राप्त केली या संदर्भामध्ये मुक्तीमार्गाचे सुद्धा प्रतिपादन असते.

दिनेश – तुम्ही त्याचा अर्थ मला समजावून सांगाल काय ?

जिनेश – नाही बाबा ! जेव्हा सिद्धचक्रविधान पूजा असते तेव्हा बाहेरून बोलाविलेले किंवा स्थानीय विद्वान जयमालेचा अर्थ सांगतात, तेव्हा आम्ही लक्ष देऊन समजून घेतले पाहिजे.

दिनेश – त्यांच्या पूजन विधानाने काय लाभ होतो ?

जिनेश – आम्ही सिद्ध स्वरूपाला ओळखून हे जाणू शकतो की, जसे हे आत्मे शुद्ध आणि पवित्र आहेत तसाच आमचा स्वभाव शुद्ध आणि निरंजन आहे, आणि त्यांच्याप्रमाणे मुक्तीचा मार्ग स्वीकारून आम्ही पण त्यांच्याप्रमाणे अनंत सुखी व अनंत ज्ञानी बनू शकतो हा पर्वराज दशलक्षण पर्वानंतर दुसऱ्या नंबरचा धार्मिक महापर्व आहे.

दिनेश – आम्ही ऐकले आहे की, सिद्धचक्र विधानाने कुष्ठरोग नाहीसा होतो. असे ऐकले की, श्रीपालराजाचा आणि त्याच्या सातशे मित्रांचा कुष्ठरोग सिद्धचक्र विधानाने मिटला. त्यांची पत्नी



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

मैनासुंदरी हिने सिद्धचक्र विधान पूजा करून गंधोदक त्यांच्यावर शिंपडले आणि कोड नाहीसे झाले.

**जिनेश** – सिद्धचक्र विधान पूजेच्या महात्म्यामुळे कुष्ठरोग नाहीसा होतो असे समजणे म्हणजे त्या पूजेचे महात्म्य कमी करणे होय. कुष्ठरोग तर शरीराचा रोग आहे आत्म्याचे कोड तर राग-द्वेष मोह आहे. जे जीव सिद्धभगवंतांच्या खऱ्या स्वरूपाला ओळखून त्यांच्यासारखेच आपल्या आत्म्याला जाणून त्यातच लीन होतील त्यांचे जन्म-मरण आणि राग-द्वेष मोह यासारखे महारोग देखील नाहीसे होतात.

सिद्धांच्या आराधनेचे खरे फळ तर वीतराग भावाची वृद्धी होणे हेच आहे. कारण ते स्वतः वीतराग आहेत. सिद्धांचा खरा भक्त त्यांच्यापासून लौकिक लाभाची इच्छा करीत नाही. तरीसुद्धा त्यांना अतिशय पुण्याचा बंध तर होतोच, म्हणून त्यास लौकिक अनुकूलता सुद्धा प्राप्त होते, पण खऱ्या भक्तांच्या दृष्टीने या लौकिक अनुकूल संयोगाचे काही महत्व नसते.

**दिनेश** – मी तर समजत होतो की, सण खाण्यापिण्याचे व मौज करण्याचेच असतात. पण आज लक्षात आले की, धार्मिक पर्व तर वीतरागतेची वृध्दी करणाऱ्या संयम व साधनांचे पर्व आहेत. बरे, मी सुध्दा तुमच्या बरोबर या दिवसात संयमाने राहीन व आत्मतत्त्वाला समजण्याचा प्रयत्न करीन.

**प्रश्न**–

१. धार्मिक पर्व कसे साजरे केले जातात ?
२. अष्टान्हिकासंबंधी आपले विचार व्यक्त करा.
३. नंदीश्वर द्वीप कोठे आहे ? त्यात काय आहे ?
४. हा पर्व केव्हा–केव्हा साजरा केला जातो ?
५. सिद्धचक्र कशाला म्हणतात ? सिद्धांच्या आराधनेचे काय फळ आहे ?
६. तुम्ही सिद्धचक्र विधान पूजा पाहिली आहे ? त्यात काय असते ? समजावून सांगा.

---



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ ९

# भगवान पार्श्वनाथ

## कविवर पं. भूधरदासजी
(बि. संवत् १७५० ते १८०६)

वैराग्यरसाने ओतप्रोत आध्यात्मिक पदांचे प्रणेते प्राचीन जैन कवींमध्ये भूधरदासजींचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांची पदे, छंद व काव्य समग्र धार्मिक समाजामध्ये अत्यंत आदराने गायिले जातात.

ते आगऱ्याचे रहिवाशी होते. त्यांचा जन्म खण्डेलवाल दि. जैन जातीमध्ये झाला होता, 'जैन शतक' नावाच्या अंतीम छंदात ते स्वतः लिहितात.

आगरे में बालबुद्धी, भूधर खण्डेलवाल,
बालकके ख्याल सो कवित्व कर जाने है।

हे हिन्दी आणि संस्कृतचे चांगले विद्वान होते. आतापर्यंत यांच्या तीन रचना प्राप्त झाल्या आहेत. त्यांची नांवे पुढीलप्रमाणे आहेत—जैन शतक, पार्श्वपुराण आणि पदसंग्रह, जैन शतकात जवळ जवळ शंभर विविध प्रकारचे छंद संग्रहित केले आहेत, जे फार सरळ आणि वैराग्योत्पादक आहेत.

पार्श्व-पुराणाला तर हिन्दीच्या महाकाव्याच्या श्रेणीत ठेवले जाऊ शकते. यात २३ वे तीर्थंकर भगवान पार्श्वनाथांच्या जीवनाचे वर्णन आहे. हे उत्कृष्ट कोटीच्या काव्य प्रतिभेने भरलेले तर आहेच पण त्याशिवाय यात अनेक सैद्धांतिक विषयांचे रोचक वर्णन सुद्धा आहे.

त्यांची आध्यात्मिक पदे त्यांची लोकप्रियता, सरळता आणि कोमल पदावलीमुळे सामान्य माणसाला आज देखील हेलावून टाकते.

पुढील पाठ त्यांनी लिहिलेल्या पार्श्व-पुराणाच्या आधारावरून घेतला आहे.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# भगवान पार्श्वनाथ

**अध्यापक** – रमेश ! तुम्ही पार्श्वनाथासंबंधी काय जाणता ?

**रमेश** – पार्श्वनाथ एका रेल्वे स्टेशनचे नाव आहे.

**अध्यापक** – तुम्ही आपल्या जागेवर उभे रहा. तुम्हाला उत्तर देण्याची पद्धतसुद्धा माहित नाही ? उभे राहून उत्तर द्यावयास पाहिजे. सभ्यतेने वागावे. आम्ही विचारतो भगवान पार्श्वनाथांसंबंधी आणि तुम्ही सांगता रेल्वे स्टेशनचे नाव.

**रमेश** – गुरुजी, मी कलकत्त्याला गेलो होतो. वाटेत पार्श्वनाथ नावाचे स्टेशन आले, म्हणून सांगितले. काही चूक झाली असल्यास क्षमा करावी.

**अध्यापक** – पार्श्वनाथ हे स्टेशनचे सुद्धा नाव आहे. पण त्या स्टेशनचे नाव पार्श्वनाथ का पडले ? हे तुम्ही जाणता काय ? तेथे जवळच एक पर्वत आहे, त्याचे नाव सम्मेदशिखर आहे. तेथून तेविसावे तीर्थंकर भगवान पार्श्वनाथांनी निर्वाण-पद प्राप्त केले होते. याच कारणामुळे की, त्या स्टेशनचे नाव सुद्धा पार्श्वनाथ ठेवलेले आहे. एवढेच नव्हे तर त्या पर्वतालासुद्धा पारसनाथ हिल म्हणतात. हे जैन लोकांचे फार मोठे तीर्थक्षेत्र आहे. येथे लाखो लोक प्रत्येक वर्षी यात्रेसाठी येतात. हे ठिकाण बिहार प्रांतात हजारीबाग जिल्ह्यात ईसरी जवळ आहे. पार्श्वनाथांशिवाय आणखी-सुद्धा पुष्कळ तीर्थंकरांनी येथून परमपद (मोक्ष) प्राप्त केले.

**सुरेश** – आणि पार्श्वनाथांचे जन्मस्थान कोणते होते ?

**अध्यापक** – काशी, ज्यास आजकाल वाराणशी (बनारस) म्हणतात. आजपासून जवळजवळ तीन हजार वर्षांपूर्वी रक्ष्वाकु-वंशाच्या काश्यप गोत्रीय वाराणशीचे नरेश अश्वसेनांच्या घरी त्यांची विदुषी पत्नी वामादेवींच्या पोटी पौष कृष्ण एकादशीच्या दिवशी पार्श्वकुमारांचा जन्म झाला होता. त्यांचा जन्म कल्याणकाचा उत्सव त्यांचे माता पिता आणि जनतेने तर साजरा केलाच होता, पण त्याबरोबरच देव आणि इंद्रांनीसुद्धा मोठ्या उत्साहाने साजरा केला होता. पार्श्वकुमार जन्मापासूनच प्रतिभाशाली आणि

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

चमत्कृत बुद्धिनिधान अवधीज्ञानी होते. ते अनेक सुलक्ष-णांनी व अतुल्य बलाने युक्त आकर्षक व्यक्तित्व असणारे बालक होते.

**सुरेश** – ते तर राजकुमार होते ना ? त्यांना तर सर्व प्रकारच्या लौकिक सुविधा प्राप्त असतील ?

**अध्यापक** – त्यात काय संशय ! ते राजकुमार तर होतेच पण त्या-बरोबर अतिशय पुण्यशाली होते देवादिक सुद्धा त्यांच्या सेवेसाठी उपस्थित रहात होते. यामुळेच त्यांना कोण-त्याही बाह्य सामुग्रीची कमतरता नव्हती, परंतु राज्य-वैभव आणि पुण्य-सामुग्रीला त्यांच्या हृदयामध्ये कोणतेही स्थान नव्हते. भोगांची लालसा त्यांना किंचितसुद्धा नव्हती. वैभवाच्या सावलीत वाढत असूनही ते जलामध्ये राहणाऱ्या कमळाप्रमाणे त्यापासून अत्यंत अलिप्त होते. त्यांच्या माता-पित्यांनी त्यांच्या विवाहासाठी खूप प्रयत्न केले. परंतु ते त्यात यशस्वी होऊ शकले नाही. ते बाल-ब्रह्मचारी राहिले.

**जिनेश** – होय का ?

**अध्यापक** – ते आत्मज्ञानी तर जन्मतःच होते, त्यांचे मन नेहमी जगापासून उदास रहात असे. एके दिवशी अशी घटना घडली की, ज्यामुळे त्यांचे हृदय हेलावून गेले आणि ते दिगंबर साधू होऊन आत्मसाधना करू लागले.

**दिनेश** – ती घटना कोणती ?

**अध्यापक** – एके दिवशी सकाळी ते आपल्या मित्रांबरोबर फिरण्या-साठी जात होते. रस्त्यात त्यांनी पाहिले की, त्यांचे आजोबा साधूच्या वेशात पंचाग्नी तप करीत होते. जळत्या लाकडामध्ये एक नाग-नागिणीची जोडी होती. ती पण जळत होती. पार्श्वनाथांनी आपल्या दिव्य ज्ञानाने (अवधी ज्ञानाने) हे सगळे जाणून घेतले आणि त्यांना हे काम करण्यास मनाई केली, पण जोपर्यंत त्या लाकडाला फोडून पाहिले नाही तोपर्यंत कोणीच त्यांचा विश्वास केला नाही. लाकूड फोडताच अर्धवट जळालेले नाग-नागीण बाहेर निघाले.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

रमेश – ते जळाले ? हे तर फार वाईट झाले, नंतर ?

अध्यापक – नंतर काय ? पार्श्वकुमारांनी त्या नाग-नागिणीला उपदेश केला आणि ते मंद कषायपूर्वक मरून धरणेंद्र आणि पद्मावती झाले.

रमेश – बरे झाले. त्यांचा भव तरी सुधारला.

अध्यापक – देव झाले यात चांगले काय झाले ? जर जीवाची रूची सन्मार्गाकडे वळेल तर चांगले झाले म्हणावे.

या हृदयविदारक घटनेने पार्श्वनाथांचे कोमल मन वैराग्यमय झाले आणि पौष कृष्ण एकादशीच्या दिवशी ते दिगम्बर साधू झाले.

सुरेश – नंतर त्यांनी तपश्चर्या केली असेल ?

अध्यापक – होय, नंतर ते अखंड मौन-व्रत धारण करून आत्मसाधनेत लीन झाले. एकदा ते अहिक्षेत्राच्या वनात ध्यानस्थ होते. आकाशमार्गाने त्यांचा पूर्वजन्माचा वैरी संवर नावाचा देव जात होता. त्यांना पाहून त्याचे पूर्व वैर जागृत झाले आणि त्याने मुनिराज पार्श्वनाथांवर घोर उपसर्ग केला. पाऊस पाडला. गारांचा वर्षाव केला, एवढेच नव्हे तर घोर वादळ उठवले, दगडांचा वर्षाव सुद्धा केला पण पार्श्वनाथ आत्मसाधनेपासून विचलित झाले नाहीत. आणि त्याचवेळी चैत्र कृष्ण चतुर्दशीच्या दिवशी त्यांना केवल ज्ञानाची प्राप्ती झाली. हे पाहून त्या देवाला पश्चाताप झाला व त्याने लोटांगण घातले.

जिनेश – आम्ही तर ऐकले की, त्याचवेळी त्या धरणेंद्र पद्मावतीने पार्श्वनाथांचे रक्षण केले होते.

अध्यापक – धरणेन्द्र पद्मावती या साधारण देव-देवी, तीन लोकांच्या नाथ असणाऱ्या तीर्थंकरांची काय रक्षा करतील? ते तर आपल्या आत्मसाधनेद्वारे पूर्ण सुरक्षित होते, पण घडले असे की त्यावेळी धरणेंद्र आणि पद्मावतीला त्यांचा उपसर्ग दूर करण्याचा विकल्प अवश्य आला होता. म्हणून त्यांनी यथाशक्ति आपल्या विकल्पाची पूर्तीपण केली होती. त्यानंतर जवळ-जवळ सत्तर वर्षे ते भारत वर्षात सम-वशरणासहित विहार करीत होते, आणि दिव्यध्वनीद्वारे



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

भव्य जीवांना तत्त्वोपदेश देत होते. ते आपल्या उपदेशां-मध्ये नेहमी आत्मसाधनेवर जोर देत होते. ते म्हणत की, हा आत्माच अनंत ज्ञान आणि सुखाचे भांडार आहे-याची श्रद्धा केल्याशिवाय, याला जाणल्याशिवाय आणि यात लीन झाल्याशिवाय कोणीही कधीही खरे सुख प्राप्त करू शकत नाही. लाखो जीवांनी त्यांच्या उपदेशा-पासून लाभ घेऊन आत्मशांती प्राप्त केली. महाकवी भूधरदासजी त्यांच्या उपदेश प्रभावाचे चित्रण करताना लिहितात-

केई मुक्ति जोग बडभाग,
भये दिगंबर परिग्रह त्याग ।
किनही श्रावक व्रत आदरे,
पसु पर्याय अनुव्रत धरे ।।
केई नारी अर्जिका भई,
भर्ता के संग बन को गई ।
केई नर पशु देवी देव,
सम्यक् रत्न लह्यो तहाँ एव ।।

x x x

इह विध सभा समूह सब, निवसै आनंद रूप ।
मानो अमृत रूप सौं, सिंचत देह अनूप ।।

याप्रमाणे उपदेश देत देत शेवटी शंभराव्या वर्षी श्रावण शुद्ध सप्तमीच्या दिवशी सम्मेदशिखरच्या सुवर्णभद्र कूटावरून ते निर्वाण-पदी विराजमान झाले.

प्रश्न :-

१. कवीवर पं. भूधरदासजींचा संक्षिप्त जीवन परिचय द्या.
२. "पारसनाथ हिल" संबंधी आपण काय जाणता ?
३. भगवान पार्श्वनाथांचा संक्षिप्त जीवन परिचय द्या.
४. 'धरणेंद्र-पद्मावतीने पार्श्वनाथांची रक्षा केली होती", याविषयी आपले विचार व्यक्त करा.
५. पार्श्वकुमार कोणत्या घटनेच्या निमित्ताने दिगंबर साधू झाले ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

पाठ १०

# देव - शास्त्र - गुरु स्तुति

(डॉ. हुकमचंद भारिल्ल, जयपूर)

समयसार[1], जिनदेव हैं जिन प्रवचन जिनवाणि ।
नियमसार[2] निर्ग्रन्थ गुरु करे कर्म की हानि ।।

देव – हे वितराग सर्वज्ञ प्रभो, तुमको ना अब तक पहिचाना ।
अतएव पड़ रहे हैं प्रभुवर, चौरासी[3] के चक्कर खाना ।।
करुणानिधि तुमको समझ नाथ, भगवान भरोसे पड़ा रहा ।
भरपूर सुखी कर दोगे तुम, यह सोचे सन्मुख खडा रहा ।।
तुम वीतराग हो लीन स्वयं में, कभी न मैंने यह जाना ।
तुम हो निरीह[4] जग से कृतकृत[5], इतना ना मैंने पहिचाना ।।
प्रभु वितराग की वाणी में, जैसा जो तत्त्व दिखाया है ।
* यह जगत स्वयं परिणमनशील, केवलज्ञानी ने गाया है ।।
उस पर तो श्रद्धा ला न सका, परिवर्तन का अभिमान किया ।
बनकर पर का कर्त्ता अब तक, सत्[6] का न प्रभो सन्मान किया ।।

---

* प्रचलित मूळप्रतीमध्ये 'जो होना है सो निश्चित है, केवलज्ञानीने गाया है" असे आहे, परंतु बालकांच्या दृष्टिने कठीण जाणून वरील परिवर्तन केलेले आहे.

१. शुद्धात्मा (स्वभाव दृष्टीने कारण परमात्मा आणि पर्यायदृष्टीने कार्य परमात्मा), २. शुद्ध (निश्चय) चारित्र, ३. ८४ लाख योनी, ४. इच्छारहित, ५. ज्यांना काहीही करणे शिल्लक राहिलेले नाही त्यांना कृतकृत्य म्हणतात. ६. वस्तु स्वभाव.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

शास्त्र–भगवान तुम्हारी वाणी में, जैसा जो तत्त्व दिखाया है।
स्याद्वाद नय अनेकान्त मय, समयसार समझाया है॥
उस पर तो ध्यान दिया न प्रभो, विकथा में समय[1] गमाया है।
शुद्धात्म रुचि न हुई मन में, ना मन को उधर लगाया है॥
मैं समझ न पाया था अब तक, जिनवाणी किसको कहते हैं।
प्रभु वीतराग की वाणी में, कैसे क्या तत्त्व निकलते हैं॥
राग धर्ममय धर्म रागमय, अब तक ऐसा जाना था।
शुभ कर्म कमाते सुख होगा, बस अब तक ऐसा मान था॥
पर आज समझ में आया है, कि वीतरागता धर्म अहा।
राग भाव में धर्म मानना, जिनमत में मिथ्यात्व कहा॥
वीतरागता की पोषक ही, जिनवाणी कहलाती है।
यह है मुक्ति का मार्ग निरन्तर, हमको जो दिखलाती है॥
गुरु – उस वाणी के अन्तर्तम[2] को, जिन गुरुओं ने पहिचाना है।
उन गुरुवर्यों के चरणों में, मस्तक बस हमें झुकाना है॥
दिन रात आतमा का चिंतन, मृदु सम्भाषण में वही कथन।
निर्वस्त्र दिगम्बर काया से भी, प्रगट हो रहा अन्तर्मन॥
निर्ग्रन्थ दिगम्बर सद्ज्ञानी, स्वातम में सदा विचरते[3] जो।
ज्ञानी ध्यानी समरससानी[4], द्वादश विधि तप नित करते जो॥
चलते फिरते सिद्धों से गुरु, चरणों में शीश झुकाते है।
हम चलें आपके कदमों पर, नित यही भावना भाते हैं॥
हो नमस्कार शुद्धातम को, हो नमस्कार जिनवर वाणी।
हो नमस्कार उन गुरुओं को, जिन की चर्या समरससानी॥

दर्शन दाता देव हैं, आगम सम्यग्ज्ञान।
गुरु चरित्र की खानि हैं, मैं बंदों धरि ध्यान॥

**प्रश्न–**

१. देव, शास्त्र आणि गुरुच्या स्तुतीमधून प्रत्येक स्तुतीतील चार–चार ओळी ज्या आपणास आवडतील त्या लिहा व का आवडल्या याचे कारण द्या.

---

१. शुद्धात्म्याचे स्वरूप, २. अंतरंग भावाला, ३. लीन राहतात, ४. समतारसामध्ये निमग्न.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# श्री वीतराग-विज्ञान विद्यापीठ परीक्षाबोर्ड

ए–४, बापूनगर, जयपूर–३०२०१५

प्रश्न पत्र

## वीतराग-विज्ञान पाठमाला भाग २

वेळ : ३ तास                                        पूर्णांक : १००

**नोट :–** सर्व प्रश्नांचे गुण समान आहेत. शुद्धता आणि स्वच्छ लेखनासाठी चार अंक सुरक्षित आहेत.

१. (क) देव-शास्त्र-गुरु पूजेमधील नैवेद्य किंवा धूपाचा छन्द अर्थासहित लिहा.

(ख) देव-शास्त्र-गुरु स्तुतीतील गुरु-स्तुतीचा भाव आपल्या शब्दामध्ये लिहा.

२. खालीलपैकी कोणत्याही चारच्या व्याख्या लिहा :–

(क) प्रथमानुयोग (ख) मदिरापान व्यसन (ग) खरा देव (घ) मांस-भक्षण व्यसन (ङ) वीतराग.

३. खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे द्या :–

(क) पूजा करण्यापासून लाभ काय ?

(ख) व्यवहाराभासी निर्जरा तत्त्वासंबंधी काय भूल करतो ?

(ग) "जसे सुख आम्हाला आहे तसेच त्यापेक्षा कितीतरी पटीने मुक्त जीवांना सुख आहे." असे मानण्यामध्ये काय बाधा आहे ?

(घ) स्वर्ग किती आहेत ? नावासहित लिहा.

(ङ) अष्टाह्निक पर्वासंबंधी आपले विचार स्पष्ट करा.

४. खालीलपैकी कोणत्याही चार मधील भेद स्पष्ट करा :–

(क) द्रव्य व्यसन आणि भाव व्यसन (ख) करणानुयोग आणि चरणानुयोग (ग) धार्मिक पर्व आणि लौकिक पर्व (घ) आस्रव-तत्त्वासंबंधी भूल आणि बंधतत्त्वासंबंधी भूल (ङ) द्रव्यहिंसा आणि भावहिंसा.

५. कोणत्याही दोनचा संक्षिप्त परिचय लिहा :–

(१) भगवान पार्श्वनाथ (२) आचार्य अमृतचंद्र (३) कविवर भूधरदास.

६. अहिंसेवर एक संक्षिप्त निबंध लिहा, त्यात अहिंसेबद्दलच्या प्रचलित चूकीच्या धारणांचे निराकरण करीत सम्यक् विवेचन असावे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# आमची मराठी प्रकाशने

| | | रु. पैसे |
|---|---|---|
| १ | सत्याचा शोध | ६–०० |
| २ | श्रावक धर्म प्रकाश | ५–०० |
| ३ | क्रमबद्धपर्याय | ५–०० |
| ४ | आपण काहीही म्हणा ? | ४–५० |
| ५ | धर्माचे दशलक्षण | ४–०० |
| ६ | तिर्थंकर भगवान महावीर आणि सर्वोदय तीर्थ | ४–०० |
| ७ | छहढाला (सचित्र) | ३–०० |
| ८ | मुक्तिचा मार्ग | २–५० |
| ९ | भगवान महावीरांच्या दृष्टिकोणातुन अहिंसा | २–०० |
| १० | कुन्दकुन्द शतक | २–०० |
| ११ | जिनपूजन रहस्य | २–०० |
| १२ | बालबोध पाठमाला भाग १ | १–०० |
| १३ | बालबोध पाठमाला भाग २ | १–२५ |
| १४ | बालबोध पाठमाला भाग ३ | १–०० |
| १५ | वीतराग विज्ञान पाठमाला भाग १ | १–२५ |
| १६ | वीतराग विज्ञान पाठमाला भाग २ | १–५० |
| १७ | वीतराग विज्ञान पाठमाला भाग ३ | १–२५ |
| १८ | लघु जैन-सिद्धान्त प्रवेशिका | ०–६० |

**मराठी व हिन्दी साहित्य प्राप्तिचा पत्ता**

**पं. टोडरमल स्मारक ट्रस्ट,**

ए–४, बापूनगर, जयपुर–३०२०१५.